दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे अंक –१३० | बुधवार दि.१४ जानेवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-130 | Wednesday, Dt.14 January 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4




# बीडच्या उपनगराध्यक्षपदी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचाच वाजणार गजर..!

बीड / वैभव स्वामी

बीडच्या नगराध्यक्षपदी पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने अटीतटीच्या लढतीत बाजी मारली. उपनगराध्यक्षपद संख्याबळानुसार मिळणे अवघड असताना दोन्ही क्षीरसागरांच्या अंतर्गत वादामुळे पवारांचा रस्ता मोकळा झाला असून आता उपनगराध्यक्ष पद देखील निर्विवाद पणे मिळेल आणि एक हाती सत्ता बीड नगरपालिकेमध्ये मिळेल. बीडच्या उपनगराध्यक्षपदी नवीन आणि आश्वासक चेहरा म्हणून विनोद मुळक यांना संधी मिळेल. तर कायम सत्तेत असलेल्या क्षीरसागरांना यावेळी विरोधी बाकावर बसावे लागेल.विरोधी पक्षनेता म्हणून डॉ. सौ.सारिका क्षीरसागर यांची वर्णी लागेल असे चित्र जवळपास दिसून येत आहे.

बीड नगराध्यक्ष पदाची निवडणूक अतिशय चुरशीची झाली. या अटीतटीच्या लढतीत शरद पवारांच्या तुतारीला आणि ताकतीने उतरलेल्या भाजपाच्या कमळाला जनतेने सत्ताधारी म्हणून स्वीकारले नाही. त्यामुळे पहिल्यांदाच विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर आणि बीड नगरपालिकेवर कायम वर्चस्व केलेल्या डॉक्टर भारतभूषण क्षीरसागर यांचे चिरंजीव डॉ. योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली ताकतीने लढलेल्या भाजपाला या दोन भावांच्या अंतर्गत वादामुळे सत्तेच्या सारीपाटावरून बाजूला सरकावे लागले आहे. ४० वर्षापासून ज्या नगरपालिकेवर आबादीत वर्चस्व होते त्या नगरपालिकेच्या सत्तेतील उबदार खुर्चीतून बाहेर पडावे लागले. आता पाच वर्ष विरोधक म्हणून ओरडत बसण्याची वेळ आली आहे. नगराध्यक्षपद

(उर्वरीत पान २ वर)



## उपनगराध्यक्षपदी विनोद मुळूक यांना मिळणार संधी तर विरोधक म्हणून डॉ सारिका क्षीरसागरांची वर्णी..!!

## कोण होणार स्वीकृत सदस्य..? उत्कंठा शिगेला..!

डॉ. योगेश क्षीरसागर, दिनेश मुंदडा, मुजीब शेख.. का अन्य कोणी...

बीड नगरपालिकेमध्ये ५२ नगरसेवक निवडून आलेले आहेत. या नगरसेवकांना ५ नगरसेवक स्वीकृत सदस्य म्हणून निवडून देण्याचा अधिकार आहे. याचाच अर्थ १० नगरसेवकातून एक स्वीकृत सदस्य होईल. त्यामुळे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे २ स्वीकृत सदस्य होतील.यामध्ये पक्षनिष्ठा कायम जपलेल्या दिनेश मुंदडांची वर्णी आमदार विजयसिंह पंडित यांच्या शिफारशीनुसार होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे नगराध्यक्षांच्या विनंतीवरून त्यांचे जावई ज्यांचा चेहरा समोर ठेवून नगराध्यक्ष पद राष्ट्रवादीला मिळवता आले ते शेख मुजीब संविधानिक प्रतिनिधी म्हणून सभागृहात असावे म्हणून नगरसेवक होऊ शकतात. त्यांचे एकूण संख्याबळ २४ आहे. ४ मतदार त्यांच्याकडे जास्त आहेत ते जर आणखीन ६ मतदार आपल्या बाजूने वळवू शकले तर त्यांचे ३ नगरसेवक स्वीकृत सदस्य होतील. तिसरा कोण असेल यासाठी मात्र टोकाचा संघर्ष नक्कीच होईल. भारतीय जनता पार्टीचे १५ सदस्य निवडून आले आहेत. १ स्वीकृत सदस्य अधिकृतपणे घोषित करता येईल यामध्ये भाजपाचे बीड विधानसभा अध्यक्ष म्हणून डॉ. योगेश क्षीरसागर हे संविधानिक पदासाठी नगरपालिकेच्या सभागृहात स्वीकृत सदस्य म्हणून जाण्याची शक्यता आहे. जर इतर पाच नगरसेवक फोडून आपल्यासोबत घेण्यात त्यांना यश आले तर त्यांचा आणखीन एक स्वीकृत सदस्य होऊ शकतो. तो कोण यासाठी देखील चांगलीच तारेवरची कसरत होईल. आमदार संदीप क्षीरसागर यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे १२ सदस्य निवडून आलेले आहे आणि त्यांच्या आघाडीतील उद्धव ठाकरे शिवसेनेचे १ नगरसेवक निवडून आलेले आहेत. त्यांच्याकडे १३ चे संख्याबळ आहे. त्यामुळे १ स्वीकृत सदस्य नगरसेवक हमखास होणार मात्र कोणाला करायचे याचे टेन्शन आमदारांना शेवटच्या क्षणापर्यंत राहणार आहे. कारण इच्छुकांची संख्या इतकी आहे की नेमकं निवडायचं कुणाला.. त्यांचे तीन सदस्य कोणाच्या बाजूने मतदान करतात त्यावर पाचवा नगराध्यक्ष ठरण्याची शक्यता आहे.

## बीड नगरपालिकेत कोणाचे कसे आहे संख्याबळ..?

अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घड्याळ या चिन्हावरील १९ नगरसेवक सदस्य आहेत.आघाडीतील शिंदे शिवसेनेचे ३ नगरसेवक सदस्य तर विजयानंतर सत्तेत सहभागी होण्यासाठी सोबत आलेले काँग्रेसचे १ नगरसेवक सदस्य आणि एमआयएम पक्षाचे १ नगरसेवक सदस्य असे एकूण २४ संख्या बळ त्यांच्याकडे आहे. शिवाय नगराध्यक्षांचं एक मत हक्काचं सोबत असल्यामुळे संख्याबळ २५ होत आहे. यानंतर सर्वाधिक नगरसेवक निवडून आलेल्या भारतीय जनता पार्टीचे कमळ या चिन्हावरील १५ नगरसेवक सदस्य आहेत. त्यांच्याकडे ५ मत जास्त आहेत. जर आणखीन एक सदस्य निवडायचा असेल तर ५ मत कमी आहेत ते इतरांचे फोडून मिळवावे लागतील. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे १२ नगरसेवक सदस्य आहेत. यांच्या आघाडीतील उद्धव ठाकरे शिवसेनेचे १ नगरसेवक सदस्य असे मिळून १३ नगरसेवकांचे संख्याबळ शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे आहे. म्हणजेच तीन नगरसेवक त्यांच्याकडे जास्त आहेत. ते कुणाकडे जातात त्यावर पाचव्या स्वीकृत सदस्यांचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.









संपादकीय....

# राजनीतीपेक्षा प्रभावी व्हावी लोकनीती!

सत्तेसाठी मूल्यांची तडजोड, बेताल विधाने आणि संधीसाधूपणाने भरलेले आजचे राजकारण लोकशाहीला घातक ठरत असून, यावर उपाय म्हणजे सजग नागरिकांनी राजकारणापेक्षा प्रभावी अशी लोकनीती उभारणे होय.

राजकारण अत्यंत खालच्या पातळीवर उतरवण्याची ऑलिंपिक स्पर्धा लागल्याप्रमाणे, राज्यातील सत्ताधारी नेते-कार्यकर्ते वागत आहेत. केंद्रात आणि राज्यात येनकेनप्रकारेन सत्ता ताब्यात ठेवणाऱ्या भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, 'लातूरमधून विलासरावांचे नामोनिशाण मिटा देंगे', अशी मुक्ताफळं उधळतात. पुण्यामध्ये भाजपने केलेल्या अमाप भ्रष्टाचाराचे पाढे, त्यांच्या मांडीला मांडी लावून मंत्रिमंडळात सहभागी असलेले त्यांचे सत्तेतील भागीदार उपमुख्यमंत्री पुराव्यानिशी मांडतात. त्यांना पत्रकारांनी भ्रष्टाचाराबद्दल काही विचारले तर म्हणतात, 'माझ्यावर सत्तर हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप करणाऱ्यांसोबत मी सत्तेत आहे'! राज्य मंत्रिमंडळात सामील असणारे नवी मुंबईतील भाजपचे एक वरिष्ठ नेते, मंत्रिमंडळातील त्यांचे वरिष्ठ असणाऱ्या दुसऱ्या उपमुख्यमंत्र्यांबाबत, 'त्यांनी माझ्या नादाला लागू नये. त्यांचाही टांगा उलटा करून टाकेन, त्यांचे घोडे फरारच नव्हे तर गायब करून टाकेन!' असे म्हणतात. राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री या साऱ्याला नुसते अपवादच ठरणार नाहीत तर राजकारणातील या चुकीच्या बाबींना आळा घालतील, ही अपेक्षाही व्यर्थ! मुघलांच्या सरदारांना जसे जळी-स्थळी-काष्ठी-पाषाणी छत्रपती राजाराम महाराजांचे सरदार संताजी-धनाजी दिसत असत, तसे यांना सर्वत्र ठाकरे बंधू दिसत आहेत. उद्धव आणि राज ठाकरे म्हातारे झालेत, अशी भाषा ते वापरतात.

'या बोटावरची थुंकी त्या बोटावर', ही स्पर्धाही सत्ताधाऱ्यांनी त्यांच्या ऑलिंपिकमध्ये सुरू केली आहे. हे करताना केंद्र आणि राज्यस्तरावरील आपलेच जोडीदार पक्ष कसे गाळात निघतील, याची पद्धतशीर तजवीज सुरू आहे. 'मीच मोठा भाऊ', अशी चढाओढ करणाऱ्या भाजपला या स्पर्धेत हरवणं इतरांना अवघड जातं. दहा नेत्यांनी, अकरा तोंडाने, बारा बेताल विधानं, तेरावेळा करायची; ही भाजपची नेहमीची खासियत आहे. उलटसुलट डायलॉगबाजी करायची आणि जे विधान फारच लोकक्षोभाला बळी पडेल ते मग निमूटपणे मागे घ्यायचं आणि वर आम्ही असं बोललोच नव्हतो, अशा थापा मारत पुढची संधीसाधू विधानं करीत सुटायचं, याचे भक्कम प्रशिक्षण भाजप नेत्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघात पुरेपूर देण्यात आलं आहे. विदर्भात आपल्या सहकारी शिंदेसेनेला स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी भाजपने ज्या एमआयएम पक्षाच्या नावे बोटं मोडण्यात उभं आयुष्य घालवलं त्याच्यासोबतच युती जाहीर केली. अंबरनाथमध्ये सहयोगी शिंदेसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी, भाजपने चक्क काँग्रेससोबत युती करायचं ठरवलं. भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाला याबाबत प्रश्न करताच, हे स्थानिक स्तरावरील निर्णय चुकीचे असल्याचे सांगत त्यांच्यावर कारवाई करू, असं सांगितलं. काँग्रेसने या पक्षविरोधी कृत्याबद्दल आपल्या १२ नगरसेवकांची लागलीच हकालपट्टी केली. भाजपने मात्र आपल्या पक्षातील स्थानिक नेत्यांवर कारवाई तर केली नाहीच उलट काँग्रेसने पक्षातून बाहेर काढलेल्या १२ जणांना भाजपमध्ये प्रवेश दिला! 'सत्तेसाठी काहीपण' ही एक नवीन ऑलिंपिक स्पर्धा भाजपने देशात सध्या सुरू केली असल्याने, त्याचा खेळ ते महाराष्ट्रातही करून दाखवत आहेत!

या सर्वांवर कडी म्हणजे कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेत भाजपने स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्त केलेले तुषार आपटे यांचे निमूट राजीनामा प्रकरण! या आपटेंचा कारनामा जनता विसरून गेली अशा भ्रमात भाजप पक्षनेते होते! देशभर 'बेटी बचाओ' म्हणून जाहिरातबाजी करणाऱ्या पंतप्रधानांच्याच भाजपने, स्वीकृती दिलेले हे तुषार आपटे म्हणजे काही महिन्यांपूर्वीच बदलापुरात एका शाळेत लहान विद्यार्थिनीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील सहआरोपी! राष्ट्रवादी काँग्रेसच्या मदतीने सत्तेवर येताच मागल्या शुक्रवारी झालेल्या नगरपरिषदेच्या विशेष सभेत नेमणूक झालेल्या स्वीकृत सदस्यांमध्ये भाजपने या आपटेंचा समावेश केला होता. जागरूक नागरिकांनी याबाबत आवाज उठवताच, दुसऱ्याच दिवशी या बेटीविरोधी बदमाशाला राजीनामा देण्याचे फर्मान भाजपला सोडावं लागलं! जनता गाफिल राहिली असती तर हा नराधम नगरपरिषदेत भाजपच्या कृपाप्रसादे निर्विघ्नपणे ५ वर्षांची मुदत पूर्ण करू शकला असता. जनतेची जागरूकता, हाच लोकशाहीतील लोकनीतीचा पाया आहे.जनआंदोलनाचा राष्ट्रीय समन्वयाशी संलग्न घर बचाओ घर बनाओ आंदोलनाने, ज्येष्ठ सामाजिक नेत्या मेधा पाटकर यांच्या संयोजनात मुंबईत विविध पक्षाचे उमेदवार, आमदार आणि नेत्यांना लोकमंचावर बोलावून, जनतेच्या अपेक्षा विदित केल्या आणि त्यावर प्रत्येकाने आपापली भूमिका मांडावी असं सांगण्यात आलं. निवडून येणाऱ्या नेत्यांनी नंतर वचनभंग करण्याचा प्रयत्न केल्यास, जनता गप्प राहणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

पुण्यात स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समितीने घोषित केलेल्या जाहीरनाम्यात आवाहन केले, 'लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येण्यामागची प्रेरणा ही जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी; प्रस्थापित जनविरोधी धोरणे बदलण्यासाठी; नैसर्गिक, आर्थिक आणि मानवी संसाधनांचा अधिक चांगला विनिमय करण्यासाठी असायला हवी. परंतु ती फक्त स्वतःच्या 'विकासा'साठी आणि आपल्या बाजूने सत्ता वळवण्यासाठी आहे असे दिसून येते.

पान १ वरून...

### बीडच्या उपनगराध्यक्षपदी.....

तर गेले मात्र उपनगराध्यक्ष आणि सभापती पदांवर आपले वर्चस्व निर्माण करता येईल एवढे संख्याबळ सुद्धा दोन्ही क्षीरसागरांकडे नाही. निवडणुकीच्या आधी आणि आता निवडणुकीच्या नंतर सत्तेसाठी सुद्धा दोन्ही भाऊ एकत्र आले नाहीत. त्यामुळे अंतर्गत वादामुळे दोघांनाही सत्तेच्या खुर्ची पासून आता कायमचे लांब बसावे लागणार आहे. त्यामुळेच अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळ या चिन्हावर निवडून आलेल्या नगरसेवकाला उपनगराध्यक्ष पदाची संधी हमखास मिळणार यात आता तीळ मात्र शंका नाही. यंदाची संक्रांत मात्र क्षीरसागरांच्या मुळावर आणि त्यांच्या विरोधकांना गोड करणारी ठरली आहे.

बीड जिल्ह्यात शिंदे शिवसेनेचे हिंदुत्व ढोंगी..?

एमआयएम ला परळीत विरोध बीडमध्ये मात्र गळ्यात गळे..!

परळी नगरपालिकेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस भाजपा महायुतीने आपल्या गटबंधनांमध्ये विरोधकच ठेवला नाही. एमआयएम ला सुद्धा आपल्या सोबत घेतलेले होते.याला शिंदे यांच्या शिवसेनेने कडाडून विरोध केला.जर एमआयएम सोबत ठेवल तर आम्ही गटाच्या बाहेर पडू असा निर्वाणीचा इशारा सुद्धा प्रेस घेऊन दिला होता. त्यामुळे परळीत अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने एमआयएम ला आपल्या गटबंधनातून मुक्त करण्याची नामुष्की स्वीकारावी लागली. त्याच शिंदेंच्या शिवसेनेने बीडमध्ये मात्र अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबत असलेल्या गटबंधन मध्ये एमआयएम ला सोबत घेऊन गळ्यात गळे घातले. आजही त्यांचे एकत्र गटबंधन आहे. मात्र त्याला साधा विरोध सुद्धा केला नाही. यावरूनच शिंदे यांच्या शिवसेनेचे बीड जिल्ह्यातील हिंदुत्व किती ढोंगी आणि लबाड आहे हे जनतेसमोर उघड झाले आहे.

श्रीगुरु तेग बहादुर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त ऐतिहासिक सोहळा

# शीख बांधवांची अखंड लंगर सेवा





बीड - प्रतिनिधी

निस्वार्थ सेवा आणि एकाच देवाची उपासना सामाजिक सेवेत समुदायाचा सहभाग या सुत्रांनी समाज उभारणी करून श्री गुरू नानक देव यांनी शीख धर्माची स्थापना केली. धर्म पुढे नेताना मुगल सम्राट औरंगजेब याचा काळ आला त्यावेळी धर्माची धुरा श्री गुरू तेग बहादूर साहेब यांच्याकडे आलेली होती.

कश्मीरी पंडितांनी त्यांच्यावर होत असलेल्या अन्यायावर तोडगा काढावा यासाठी बलिदान देण्याची तयारी श्री गुरू तेग बहादूर यांनी दाखवली व त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान केले. त्यामुळे मुगल सैन्याचा त्रास कमी झाला. त्यामुळे श्री गुरू तेग बहादूर यांना हिंद दी चादर म्हंटले जाते.

आपला धर्म सर्वसमावेशक अर्थात समाजातील सर्व घटकांना सामावणारा बनविण्याचे मोठे काम त्यांनी आपल्या कार्यकाळात केले. त्यांनी इ.स.१६२१ ला जन्म झालेल्या श्री गुरू तेग बहादूर यांनी १६७५ साली सर्वोच्च बलिदान दिले.त्यांच्या बलिदानानंतर त्यांचे पुत्र श्री गुरू गोविंदसिंह हे दक्षिणेत आले आणि नांदेड येथे अखेरपर्यंत निवास केला. कोणतीही व्यक्ती यापुढे गुरूपदी येणार नाही तर श्री गुरू ग्रंथ साहिब हे यापुढे गुरू असे जाहिर केले. त्यानंतर एक ईश्वर अर्थात ओंकार आणि गुरू ग्रंथ साहेब याचीच पूजा शीख धर्मात होते.

श्री गुरू तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागमाचा मोठा कार्यक्रम या निमित्ताने नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ या काळात होणार आहे. याच्या आयोजनात महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेतला आहे.

शीख समाजाची उभारणी सामुदायिक आणि निस्वार्थ सेवा कार्यावर आधारित आहे. यामध्ये लंगर सेवा, गुरूद्वारा सेवा, शिक्षण व युवा विकास तसेच आपत्तीच्या काळात मदत यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

लंगर सेवा खऱ्या अर्थाने वेगळ्या प्रकारची सेवा आहे. एकता, समानता योच दर्शन आपण होईल प्रत्येक व्यक्ती स्वयंसेवक होवून जेवण बनविण्यापासून ते सर्वांना मोफत देण्याचे काम होते. अगदी भांडी स्वच्छ करण्यासाठी स्वयंसेवक होण्यासाठीही सर्व जण पुढाकार घेतात.अमृतसर येथील श्री हरिमंदीर अर्थात सूवर्ण मंदीर येथे २४ तास कोणताही खंड न पडू देता ही लंगर सेवा चालते. या ठिकाणी जगभरातील शीख धर्मिय तसेच इतर धर्माचेही लाखो भाविक, पर्यटक येत असतात. येथे कोणताही जात, धर्म याच्या पलिकडे जाण्यायेणाऱ्या प्रत्येकास ही लंगर सेवा उपलब्ध आहे.गुरूद्वारा हुजूर साहिब अर्थात नांदेड येथे गुरूद्वारा ते सुवर्ण मंदीर अशी थेट रेल्वे सेवा सुरू झालेली आहे. ही रेल्वे नांदेड स्थानकातून निघण्यापूर्वी रेल्वेतील प्रत्येक प्रवाशाला लंगर प्रसाद शीख बांधव पूरवित आहे. या रेल्वेच्या मार्गावर थेट अमृतसर पर्यंत दुपारचे तसेच रात्रीचे जेवण या स्वरूपात लंगर प्रसाद दिला जातो. असे असणारी ही भारतातील एकमेव रेल्वे आहे.

श्री गुरू तेग बहादूर यांचा ३५० वा शहिदी समारंभ याच नांदेड नगरीत होणार आहे हे इथे विशेष.

शब्दांकन...
**श्री.प्रशांत दैठणकर,**
बीड जिल्हा माहिती अधिकारी तथा
उपसंचालक छत्रपती संभाजीनगर
९८२३१९९४६०

# पदवीधर मतदारसंघाची अंतिम मतदार यादी जाहीर

**विभागात एकूण २ लाख ८८ हजार ७८३ मतदारांची नोंद**

छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली अंतिम मतदार यादी छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त कार्यालयाकडून आज प्रसिद्ध करण्यात आली आहे.

१ नोव्हेंबर २०२५ हा अर्हता दिनांक निश्चित करून तयार करण्यात आलेल्या प्रारूप मतदार यादीत विभागात २ लाख ४० हजार ५४९ मतदारांची नोंद होती. त्यानंतर मतदार यादीत नव्याने नावे यादीत समाविष्ट करावयाच्या मुदतीत प्राप्त अर्जांच्या छाननीअंती ४८ हजार २३४ नावे नव्याने समाविष्ट करण्यात आली. त्यामुळे औरंगाबाद विभाग पदवीधर मतदार संघात छत्रपती संभाजीनगर (८०८८६) जालना (३१९४३), परभणी (२३५६४), हिंगोली (९०९९), नांदेड (३४५२१), लातूर (२७६८८), धाराशिव (२६८७६), बीड (५४२०६) असे एकूण २,८८,७८३ नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात आली.

अंतिम मतदार यादीत विभागातील एकूण मतदारसंख्या २,८८,७८३ इतकी झाली असून यामध्ये २,२१,१६१ पुरुष, ६७,६०९ महिला आणि १३ इतर मतदारांचा समावेश आहे. मतदार नोंदणीची प्रक्रिया यापुढेही चालू राहणार आहे.


## जाहीर प्रगटन

**श्री.एस.एस.बडगुजर सह-दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, केज यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज १४/२०२६**
**सुरेश विरूध्द निरंक**

अर्जदार :-
१) सुरेश पि. बारीकराव कापरे, वय-५६वर्षे,
धंदा-शेती रा. कापरेवाडी ता. केज जि. बीड
ह.मु. डिकसळ ता. कळंब जि. धाराशिव
२) चंद्रकांत पि. बारीक कापरे, वय-५२ वर्षे,
धंदा-शेती रा. कापरेवाडी ता. केज जि.बीड
३) सतिष पि. बारीकराव कापरे, वय-४६वर्षे,
धंदा-शेती रा. कापरेवाडी ता. केज जि. बीड
४) दिनकर पि. बारीक कापरे, वय-४२वर्षे,
धंदा-शेती रा. कापरेवाडी ता. केज जि.बीड
मागणी -कलम ३७२ भारतीय वारसा हक्क कायादा १८७२

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत बारीकराव उर्फ बारीक पि. बाळाराम कापरे रा. कापरेवाडी ता. केज जि. बीड, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी विधिज्ञ उ.बी. निर्गुळे यांचे मार्फत अर्ज केला आहे. ज्याअर्थी, बारीकराव उर्फ बारीक पि. बाळाराम कापरे रा. कापरेवाडी ता. केज जि. बीड, यांचा मृत्यु दि. १८.१२.२०२५ रोजी कापरेवाडी ता. केज जि.बीड येथे झाला असुन वरील अर्जदार हे मयताचे वारस आहेत. मयताचे नांवावरील दिलेल्या तक्त्यामधील वर्णन केलेल्या बचत खात्यामधील रक्कम मिळणे साठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

| ए.के. | बँकेचे नाव | खाते क्र. | रक्कम रू. |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा चिंचोली माळी ता.केज जि.बीड | ८०००७३४९७२० | १९७५६९/- |
| २. | महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा चिंचोली माळी ता.केज जि.बीड | ८०००२२५०३२८ | ८३७००/- |

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत बारीकराव उर्फ बारीक पि. बाळाराम कापरे रा. कापरेवाडी ता. केज जि. बीड, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०१/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयायचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २०/०२/२०२६ आहे.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर, केज

स्वाक्षरित/-
**सहा.अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर, केज



**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १९/२०२६**
प्रियंका विरुध्द निरंक
**(मार्फत ॲड एस.ए. शेजूळ )**

ज्याअर्थी मयत नाम वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय औरंगाबाद दत्ता वसंत गवारे हे या दिनांक ०४.१०.२०२५ राजी शासकीय छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार
१) प्रियंका भ्र. दत्ता गवारे वय ३१ वर्षे धंदा शेती व घरकाम रा. देवपिंपरी त्ता. गेवराई जि. बीड.
२) आर्या पि. दत्ता गवारे वय १२ वर्षे, अ.पा.क. अर्जदार नं. १ आई प्रियंका भ्र. दत्ता गवारे रा. सदर
३) आर्णव पि. दत्ता गवारे वय ०६ वर्षे, अ.पा.क. अर्जदार नं. १ आई प्रियंका भ्र. दत्ता गवारे रा. सदर
४) कमल भ्र. वसंत गवारे
वय ७० वर्षे धंदा- शेती व घरकाम रा. देवपिंपरी ता. गेवराई जि. बीड.
५) वसंत पि. आप्पासाहेब गवारे वय ७२ वर्षे धंदा- शेती
रा. देवपिंपरी ता. गेवराई जि. बीड.

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्रानी आवश्यकता आहे करीता मुबई ग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे कला आह त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदा मयताचे कायदेशीर वारम नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या येत्या दिनांकापासून तीस दिवसाने आत त्याने या न्यायालयात हजर होतून आपल्या हरकती कळयाव्यात आणि या लेखावरन अयती कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय मटर अर्जदागच्या करवन लागलीन पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जतार यांना गदर मयत नाम दत्ता वसंत गवारे रा. देवपिंपरी ता. गेवराई कि बीड याचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल

आज दि.-/-/- रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

पुढील तारिख -२१/०२/२०२६
स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई



## जाहीरनामा

**वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**
**श्रीमती एम.एस. कुलकर्णी दिवाणी न्यायाधिश क.स्तर, केज,**
**यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ०४/२०२६**
**शंकर विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा मयत लता उर्फ लताबाई भ्र. शंकर उर्फ शंकरराव ताटे रा. समतानगर, केज ता. केज. जि. बीड हे दिनांक १३ माहे ०९ सन २०२४ रोजी लता उर्फ लताबाई भ्र. शंकर उर्फ शंकरराव ताट मौजे स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, अंबाजोगाई येथे मयत झाले आहेत. अर्जदार यांनी हया कोर्टास सदरह लता उर्फ लताबाई भ्र. शंकर उर्फ शंकरराव ताटे रा. समतानगर, केज ता. केज. जि. बीड यांचे मृत्यू नंतर त्यांना शासकीय व निमशासकीय कार्यालयीन कामकाजाचा लाभमिळणेसाठी वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज विधिज्ञ मस्के एस. बी. यांचे मार्फत दाखल केला आहे.

अर्जदार :
०१.शंकर उर्फ शंकरराव पि. शिवाजी ताटे वय ६० वर्षे,
धंदा-सेवानिवृत्त रा.समतानगर, केज ता केज जि बीड ह.मु. १९
राजीव गांधी नगर, शिवाजी नगर, रेशनिंग गोडाउन मागे,
शिवाजी नगर, पुणे महाराष्ट्र ४११००५
०२. गौरव पि. शंकर उर्फ शंकरराव ताटे वय-२० वर्षे,
धंदा-शिक्षण रा. समतानगर, केज ता केज जि बीड
०३.ज्ञानेश्वरी पि. शंकर उर्फ शंकरराव ताटे
वय-२२ वर्षे, धंदा-घरकाम
रा. मोरेवाडी ता अंबाजोगाई जि बीड

त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु लता उर्फ लताबाई भ्र. शंकर उर्फ शंकरराव ताटे रा. समतानगर, केज ता. केज. जि. बीड यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात देईल.


आज २०२६ सालचा पहिला महिना, ६ वा महिना आहे.
पु.ता. २०/०२/२०२६

**स्वाक्षरित/-**
**वरिष्ठ लिपीक**

**आदेशावरुन**
**स्वाक्षरित/-**
**अधीक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, केज**

# ना.अजितदादा पवारांकडून बीडच्या विकासाला अधिकच बळ !

## बीडच्या आरटीओ कार्यालयाच्या १२ कोटीच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता, आमदार विजयसिंह पंडित यांची माहिती

बीड /प्रतिनिधी

विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून बीडमध्ये विकास कामांना बळ मिळत असून अनेक विकासाचे प्रश्न मार्गी लागत आहेत. गेल्या अनेक दिवसापासून बीडच्या आरटीओ कार्यालयाच्या रखडलेल्या इमारतीचा प्रश्न उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी निकाली काढला आहे. उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बीडच्या इमारत बांधकामाच्या १२ कोटी ५१ लाख रुपये च्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. हा निधी दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आभार मानले आहेत.

विविध विकास कामांच्या उद्घाटनाच्या निमित्ताने विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार बीडमध्ये येत असताना आमदार विजयसिंह पंडित यांनी बीड येथील नाट्यगृहाच्या कामासंदर्भात आठवण करून दिली. त्यावर ना.अजित दादानी पुण्यावरून येत असताना पुणे विमानतळावर नाट्यगृहाच्या कामासंदर्भातली फाईल बोलून घेत त्यावर स्वाक्षरी करून बीड मधील नाट्य प्रेमींच्या आग्रहाची मागणी असलेला नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचा प्रश्न मार्गी लावला. त्यासाठी ८ कोटी रुपये एवढा निधी दिला.त्यानंतर आमदार विजयसिंह पंडित यांनी उपप्रादेशिक परिवहन कार्यालय बीडच्या इमारतीचा प्रश्न दादांच्या कानी टाकला होता, याबाबत सातत्याने प्रशासनाशी देखील आमदार विजयसिंह पंडित यांचा पाठपुरावा सुरू होता. त्यावर तसा प्रस्ताव परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र शासनाकडे सादर केला होता. त्यास दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी गृह परिवहन विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडून १२ कोटी ५१लक्ष ६००० रुपये इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय वित्ती मान्यता देण्यात आली आहे. बीडच्या आरटीओ कार्यालयाच्या इमारतीसाठी नामदार अजित दादा पवार यांच्याकडून १२ कोटी पेक्षा अधिकचा निधी दिल्याबद्दल विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आभार मानले आहेत.

शासकीय कार्यालयांना मिळतात हक्काच्या इमारती

बीडमध्ये अनेक शासकीय कार्यालयांना स्व मालकीच्या इमारती नसल्याने किरायाच्या इमारतीमध्ये कार्यालय सुरू आहेत. याबाबतचा प्रश्न आमदार विजयसिंह राजे पंडित यांनी सातत्याने विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मांडला. यामध्ये सहकार भवनच्या इमारतीचा देखील प्रश्न सुटला असून त्याचे भूमिपूजन करण्यात आले आहे, त्याचबरोबर अनेक शासकीय कार्यालयांना हक्काच्या इमारती मिळू लागल्या आहेत. यामध्ये सहकार भवन इमारत, प्रशासकीय कार्यालयाची इमारत, आणि आता आरटीओ कार्यालयाच्या इमारतीचा प्रश्न मार्गी लागलेला आहे.

# गुरुनानक प्रा. विद्यालयात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंदांना अभिवादन



बीड /प्रतिनिधी

श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी सांगवी ता. केज जि.बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालय, शाहू नगर बीड येथे स्वराज्य प्रेरिका राजमाता जिजाऊ तसेच युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए. या होत्या. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाल्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. यात शेळके शंतनू, जापडिया संजना, पवने विराज यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. बालवाडीची शेळके आरोही ने जिजाऊ साठी एका सुंदर कवितेचे गायन केले तर जिशान बागवान याने स्वामी विवेकानंदांचे विचार मुलांना सांगितले.प्रमुख मार्गदर्शकाची भूमिका पार पाडताना श्री तांदळे ए. ए. यांनी जिजाऊ मासाहेब यांच्या स्वराज्य स्थापनेतील महत्त्वाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. जिजाऊनी वेळोवेळी कौतुकाची थाप पाठीवर दिली म्हणूनच महाराष्ट्राच्या मातीतून ही नर रत्ने निर्माण झाली ही गोष्ट एका सुंदर प्रसंगातून सरांनी मुलांच्या मनावर बिंबवली.

नेहमीप्रमाणे उत्साही विद्यार्थिनींनी राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषेत येऊन कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमाचे सुंदर असे सूत्रसंचलन श्रीमती मुंडे एस. व्ही. यांनी केले तर उपस्थितांचे आभार श्री ठोकरे एम.व्ही यांनी मानले.या कार्यक्रमास श्रीमती पवने पी.एम.व शेळके मॅडम यांची उपस्थिती लाभली.

# ताल साधना म्युझिक सर्कल आयोजित पं. अरविंदकुमार आझाद यांच्या तबला कार्यशाळेला मोठा प्रतिसाद




बीड /प्रतिनिधी

येथील तबला वादक तथा प्रशिक्षक प्रकाश मानूरकर यांच्या ताल साधना म्युझिक सर्कलच्या वतीने देशातील आघाडीचे तबला वादक पं. अरविंदकुमार आझाद यांच्या तबला कार्यशाळेस मराठवाड्यातील नवोदित तबला साधकांनी मोठा प्रतिसाद देत तबला वादनातील बारकावे शिकून घेतले.एकाच वेळी माहिती आणि वादन असे या ताल यज्ञाचे स्वरूप होते.बनारस घराण्याचे सुप्रसिद्ध तबला वादक पंडीत अरविंदकुमार आझाद यांचा विविध मैफिलीतील तबला वादन विविध कार्यक्रमात आयोजित केले जाते.बनारस घराण्याची शैली आहे हे आझाद यांच्या वादनाचे वैशिष्ट्य असून आजपर्यंत त्यांनी पं. राजन-साजन मिश्रा,पं. हरिप्रसाद चौरसिया, पं. रोनू मुजुमदार पं. राकेश चौरसिया यांच्यासह देशभरातील दिग्गज कलावंतांची साथ केली आहे.त्यांची गायन-वादन खुलवणारी साथ आणि एकल तबला वादन हे त्यांच्या वादनाचे आकर्षण आहे. येथे आयोजित कार्यशाळेत त्यांनी रियाझ कसा करावा,लय कशी सांभाळावी,वादनात सौंदर्य कसे निर्माण करावे, साथ कशी करावी ? या संबंधीच्या टिप्स प्रात्यक्षिकासह देत त्या ताल साधकांकडून गिरवून घेतल्या .पंढत,निकास,दाया,बाया,सम,काल, त्रीपल्ली म्हणजे काय ? हे पं.अरविंदकुमार आझाद यांनी आपल्या सहजसुंदर नर्मविनोदी शैलीत समजावून दिलं. तर आपल्या मनोगतात तबला आणि अध्यात्म या विषयावर भाष्य केले. या कार्यशाळेत त्यांनी शिकवत शिकवत मनसोक्त तबला वादन करून मंत्रमुग्धतेचा अनुभव दिला.या कार्यक्रमापूर्वी प्रकाश मानूरकर यांनी त्यांच्या 'प्रभुलीला निवास' येथे पंडितजींचे विधिवत गुरुपूजन केले. या ताल यज्ञाचा शुभारंभ डॉ.दिपाताई क्षीरसागर, भरतअण्णा लोळगे,संतोष मानूरकर आणि महेश वाघमारे यांच्या हस्ते सरस्वती पूजनाने करण्यात आला. यावेळी डॉ.दीपाताई क्षीरसागर यांनी अशा प्रशिक्षण वर्गाचे कार्यशाळेचे आयोजन सातत्याने व्हायला हवे आणि आपण यात पुढाकार घेऊ असे सांगितले तर आगामी काळात 'ताल कचेरी' या तबलावादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन पं आझाद यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्याचा मानस महेश वाघमारे यांनी व्यक्त केला. यावेळी हार्मोनियमवर लहरा (नगमा ) संगत दिनेश डोळे यांनी केली व्यासपीठावर तबला वादक अनिल डोळे हे उपस्थिती होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक बिल्पे यांनी केले तर आभार प्रकाश मानूरकर यांनी मानले.कार्यक्रमास सतीश सुलाखे, सुदर्शन धुतेकर, सौ.सुनंदा देशमुख, सुधीर देशमुख, योगीराज वाघमारे, के.सी.चव्हाण, यांच्यासह रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्वसामान्य कुटुंबातून पीएच. डी. पर्यंतचा प्रा. माने यांचा प्रेरणादायी प्रवास

मस्साजोग /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यातील आंबेवडगाव येथील प्रा. बाबासाहेब माने यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६६ व्या वार्षिक दीक्षांत समारंभात पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली.

हा दीक्षांत समारंभ भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (कबरएफ) येथील प्राध्यापक

डॉ. सुनील भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत छत्रपती संभाजीनगर येथे पार पडला, याकार्यक्रमास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. विजय फुलारी, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. वाल्मीक सरवदे, कुलसचिव प्रा. प्रशांत अमृतकर यांच्यासह प्रा. बाबासाहेब डोळे उपस्थित होते. प्रा. बाबासाहेब माने यांनी नव्वदोत्तर काळातील बदलत्या राजकारणाच्या संदर्भात विजय



मराठवाडा विद्यापीठाच्या दीक्षांत सोहळ्यात प्रा. बाबासाहेब माने यांचा विविध मान्यवरांच्या हस्ते गौरव

जावळे यांच्या कथात्मक साहित्याचा अभ्यास या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. हा प्रबंध यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, अंबाजोगाई येथील प्राचार्य डॉ. शिवदास झेड. शिरसाठ यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला. प्रा. माने यांनी एम.ए. बी. एड. एम. फिल. अशा पदव्या यशस्वीरीत्या पूर्ण केल्या आहेत, त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल विभागप्रमुख तथा प्राचार्य डॉ. शिवदास शिरसाठ, उपप्राचार्य प्रा. शिंदे सर, प्रा. दिलीप भिसे, प्रा. राजपंखे, प्रा. घोडके, प्रा. भारती, प्रा. लोखंडे, प्रा. सुरेवाड, प्रा. हंडीबाग यांच्यासह यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.पुढील कार्यासाठी शुभेच्छा देत जिल्हाभरातून त्याचे कौतुक होत आहे.

प्रेरणादायी वाटचाल...

सर्वसामान्य कुटुंबातून आलेले प्रा. बाबासाहेब माने यांचा शैक्षणिक प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरतो. ग्रामीण भागात शिक्षण घेत असताना आलेल्या अडचणी, मर्यादित साधनसंपत्ती असूनही त्यांनी अभ्यासाची कास सोडली नाही, शिक्षक म्हणून कार्य करत असतानाच उच्च शिक्षण आणि संशोधनाची जिद्द त्यांनी कायम जपली. विद्यार्थ्यांशी आपुलकीने वागणारे, अभ्यासा बरोबरच सामाजिक जाणीव जपणारे व्यक्तिमत्व म्हणून प्रा. माने ओळखले जातात. कष्टाला पर्याय नाही हा मंत्र त्यांनी आपल्या कृतीतून सिद्ध केला आहे. पीएच. डी. पदवी मिळवणे हे केवळ वैयक्तिक यश नसून ग्रामीण भागातील तरुणांसाठी हे प्रेरणा देणारे यश आहे.

# नैसर्गिक अनुदान घोटाळ्यात फरार आरोपींना अखेर बेड्या


## आर्थिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई पाच महिने पोलिसांना चकवा देणारे दोन आरोपी अटकेत

२४० गावांत २४ कोटी ९० लाखांहून अधिक रकमेचा अपहार उघड

जालना /प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अंबड व घनसावंगी तालुक्यात नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या नावावर शासनाच्या अनुदानात झालेल्या महाघोटाळ्यातील फरार आरोपींना अखेर आर्थिक गुन्हे शाखेने अटक करून मोठा धक्का दिला आहे.तब्बल पाच महिने पोलिसांना हुलकावणी देत राजस्थान,दिल्ली व गुजरातमध्ये लपून बसलेले विजय हनुमंत जोगदंड व दिनेश ज्ञानेश्वर बेराड या दोन आरोपींना जालना शहरात अटक करण्यात आली आहे.नैसर्गिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने वेळोवेळी ४ जी.आर.काढून अनुदान जाहीर केले होते.मात्र अंबड व घनसावंगी तालुक्यातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगनमत करून शेती नावावर नसलेली बोगस नावे याद्यांत अपलोड करत अनुदानाची रक्कम परस्पर उचलल्याच्या गंभीर तक्रारी समोर आल्या होत्या.या प्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी समिती गठीत केली.

चौकशीत २४० गावांमध्ये तब्बल २४,९०,७७,८११ रुपये इतक्या शासकीय निधीचा अपहार झाल्याचा धक्कादायक अहवाल समोर आला. त्यानंतर अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा




रजि. क्र. ४५३/२०२५ अन्वये २२ तलाठी, तहसील कार्यालयातील ५ कर्मचारी व जिल्हाधिकारी कार्यालयातील १ कर्मचारी अशा एकूण २८ आरोपींविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला.

गुन्हा नोंद झाल्यापासून आरोपी फरार झाले होते.मोबाईल वापर टाळणे,सोशल मीडियापासून दूर राहणे,ठिकाणे व वेशभूषा सतत बदलणे अशा क्लुप्त्या वापरून आरोपी पोलिसांना गुंगारा देत होते.अटकपूर्व जामिनासाठी धडपड करत असतानाच आर्थिक गुन्हे शाखेने गोपनीय माहितीच्या आधारे जालना शहरातील विशाल कॉर्नर परिसरात सापळा रचून त्यांना अटक केली.अटक करण्यात आलेले आरोपी विजय हनुमंत जोगदंड वय ४३ मंडळ अधिकारी,घनसावंगी रा.हडको एन-१२,छत्रपती संभाजीनगर,

दिनेश ज्ञानेश्वर बेराड वय ३५ सहाय्यक महसूल अधिकारी रा. पिंपळगाव रेणुकाई ता. भोकरदन जि.जालना

दोन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले असून उर्वरित फरार आरोपींचा शोध युद्धपातळीवर सुरू आहे. आतापर्यंत या प्रकरणात एकूण १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.ही संपूर्ण धडाकेबाज कारवाई पोलीस अधीक्षक मा. श्री.अजयकुमार बन्सल,अपर पोलीस अधीक्षक श्री.आयुष नोपाणी व प्रभारी पोलीस उपअधीक्षक आर्थिक गुन्हे शाखा श्री.सिद्धार्थ माने यांच्या मार्गदर्शनाखाली स. पोलीस निरीक्षक श्री.मिथुन घुगे यांच्या नेतृत्वात पार पडली.

या पथकात पोलीस अंमलदार गोकुळसिंग कायटे,समाधान तेलंग्रे,किरण चव्हाण,अंबादास साबळे,गजानन भोसले,सागर बावीस्कर,दत्ता वाघुंडे,विष्णु कोरडे,ज्ञानेश्वर खुने,रविंद्र गायकवाड,शुभम तळेकर,श्रेयस वाघमारे,चालक पाठक मेजर तसेच महिला अंमलदार जया निकम,निमा घनघाव,मंदा नाटकर यांचा समावेश होता.




# गोंदी पोलिसांची धडाकेबाज कारवाई सराईत व कुख्यात गुन्हेगाराला बेड्या

## चोरी-दरोड्यांच्या गुन्ह्यांत सक्रिय असलेला आरोपी अखेर पोलिसांच्या ताब्यात

जालना /प्रतिनिधी

धार जिल्ह्यात वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीविरुद्ध गोंदी पोलीस स्टेशनने आक्रमक पवित्रा घेत सराईत व कुख्यात गुन्हेगाराला अटक करून कायदा व सुव्यवस्थेचा ठाम संदेश दिला आहे.गोंदी पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आशिष खांडेकर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अत्यंत गोपनीय व नियोजनबद्ध तपास करत ही महत्त्वाची कारवाई यशस्वी केली.अटक करण्यात आलेला आरोपी कुर्मा रतन भील रा.तांडा जि. धार मध्यप्रदेश हा गेल्या अनेक वर्षांपासून चोरी,दरोडा व गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांत सक्रिय होता.त्याच्याविरुद्ध विविध पोलीस ठाण्यांत अनेक गंभीर गुन्हे दाखल असून, त्यात राजगड पोलीस स्टेशन गुन्हा क्र. १०३/२०२३, ११४/२०२३, १४०/२०२३ भा.दं.वि.कलम ४७९,गुन्हा क्र.१७७/२०२३ भा.दं.वि.कलम ३९४,३९५,३९७, गुन्हा क्र.१३२/२०२५,३०९(२) इछड तसेच तांडा पोलीस स्टेशन गुन्हा क्र. ८८/२०२५,१०९ इछड असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. हा आरोपी बराच काळ पोलिसांना गुंगारा देत फरार होता. मात्र प्रभारी अधिकारी आशिष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कॉन्स्टेबल दीपक भोजने व पोलीस कॉन्स्टेबल सय्यद सलमान यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण, गुप्त माहिती आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करत आरोपीचा ठावठिकाणा निश्चित केला आणि त्याला अटक करण्यात यश मिळवले.या धडाकेबाज कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना बळावली असून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना पोलिसांचा कडक इशारा देण्यात आला आहे गोंदी पोलीस स्टेशनची ही कारवाई जालना जिल्हा पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचे शिस्तबद्ध व परिणामकारक पोलिसी कारवाईचे ठळक उदाहरण ठरत आहे.जालना जिल्हा पोलीस प्रशासन नागरिकांच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध असून कोणत्याही गुन्हेगाराला पाठीशी न घालता भविष्यातही कठोरात कठोर कारवाई केली जाईल असा ठाम निर्धार यानिमित्ताने व्यक्त करण्यात आला आहे.

श्रीगुरु तेग बहादुर साहेबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त ऐतिहासिक सोहळा

# हिंद दी चादर- श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त बीड जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन

बीड /प्रतिनिधी

श्री गुरु तेग बहादुर यांचा गौरवशाली इतिहास सर्वसामान्यांपर्यंत पोहचावा यासाठी बीड जिल्ह्यातील विविध शाळां व महाविद्यालयांमध्ये रांगोळी, निबंध, चित्रकला, हस्तकला स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच नांदेड येथील कार्यक्रमाच्या प्रचारासाठी प्रचार रथ तयार करून तो बीड जिल्हयात फिरवण्याचे नियोजन करण्यात येणार आहे असे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निश्चित करण्यात आले.

नांदेड येथे होणा-या कार्यक्रमासाठी छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, जालना, लातूर, धाराशिव, हिंगोली, बीड, नंदुरबार, धुळे व जळगाव या ११ जिल्हयांचा समावेश करण्यात आला आहे. संपूर्ण राज्यातील शीख सिकलीकर, बंजारा लबाना, मोहियाल, सिंथी व इतर सर्व समाज यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे.या कार्यक्रमास बीड जिल्हयातील सर्व समाज बांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे यासाठीचे नियोजन करण्यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी, बीड, उपविभागीय अधिकारी, बीड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, (पं.) जि. प. बीड, जिल्हा नियोजन अधिकारी, बीड, तहसिलदार बीड. शिक्षणाधिकारी, प्राथमिक / माध्यमिक, जि.प.बीड, मुख्याधिकारी नगर परिषद, बीड व जिल्हा माहिती अधिकारी, बीड, प्रीती आनंद कुकडेजा अध्यक्ष (सिंधी समाज प्रतिनिधी), डॉ मदन जेस्वानी उपाध्यक्ष (सिंधी समाज प्रतिनिधी) व आनंद विजयकुमार कुकडेजा सचिव (सिंधी समाज प्रतिनिधी) हे उपस्थित होते. हिंद-की-चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड पेथे होणा-या कार्यक्रमाची जास्तीत जास्त प्रसिध्दी करण्यासाठी या बैठकीत चर्चा करण्यात आली.श्री गुरु तेग बहादुर हे शीख धर्माचे ९ वे गुरू होते, त्यांना हिंद-की-चादर म्हणून ओळखले जाते. श्री गुरु तेग बहादुर यांनी शिख धर्मात प्रार्थना, परोपकार, सेवा, साधेपणा, इतरांच्या सेवेला महत्व आणि निर्भीडपणा यांचा प्रचार केला, त्यांचे प्रवचन व भजन यांचा गुरु ग्रंथ साहिब यामध्ये देखील समावेश आहे. श्री गुरु तेग बहादुर यांनी १७ व्या शतकामध्ये तत्कालीन शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरूद्ध आवाज उठवून धर्म स्वातंत्र्य आणि मानवी हक्कांसाठी बलिदान देवून भारताच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या बलिदानामुळे संपूर्ण भारतात तसेच शिख धर्मात शौर्य आणि त्यागाची परंपरा अधिक मजबूत झाली.मुघल सम्राटांच्या विरोधात जाऊन भाई लकीशा बंजारा यांनी नववे गुरु तेग बहादूर यांच्या पवित्र शरीरास आपला तांडा व घर जाळून अग्नी दिला या बाबीस भारतीय इतिहासात अनन्य साधारण महत्व आहे. श्री गुरु तेग बहादुर यांचे सन-२०२५ हे ३५० वे शहीदी समागम शताब्दी वर्ष असल्याने त्यांचा गौरवशाली इतिहास सर्वांना माहित व्हावा, तसेच त्यांनी केलेला प्रचार व दिलेले बलिदान याचे स्मरण होण्याकरीता नांदेड येथे दि.२४.०१. २०२६ व दि.२५.०१.२०२६ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथील नियोजित असलेल्या कार्यक्रमात बीड जिल्हयातील सर्व, नागरिकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त ऐतिहासिक श्रमदान

## नांदेड येथील हिंद-दी-चादर कार्यक्रमात सहभागी होण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन





नांदेड /प्रतिनिधी

श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मोदी मैदान येथे भव्य धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाच्या कालावधीत मैदानावर गुरुद्वारा प्रतिकृती (दरबार साहिब) असणार असल्याने भाविकांना चप्पल अथवा बूट न वापरता अनवाणी प्रवेश करावा लागणार आहे. त्यामुळे भाविकांना चालताना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत विशेष श्रमदान उपक्रम राबविण्यात आला.

या श्रमदानात नांदेड जिल्ह्यातील १,५०० विद्यार्थी, कॅडमीचे ५०० विद्यार्थी महापालिकेचे कर्मचारी तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. श्रमदानाद्वारे मैदानावरील खडे वेचून परिसर स्वच्छ करण्यात आला.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक, क्षेत्रीय धर्मजागरण समितीचे प्रमुख महेंद्रजी रायचुरा, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, तहसीलदार आनंद देऊळगावकर, शिक्षणाधिकारी माधव सलगर, रेडक्रॉसचे हर्षद शहा, मनपा अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पांचगे आदी उपस्थित होते.

खालसा हायस्कूल, राजर्षी पब्लिक स्कूल, नागार्जुना हायस्कूल, सचखंड पब्लिक स्कूल यासह पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी, विविध एनजीओ, सोल्जर कॅडमी, तोटेवाड फिजिकल कॅडमी, नांदेड फिजिकल व गरुडा फिजिकल कॅडमीच्या विद्यार्थ्यांनी या श्रमदानात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

या श्रमदानातून गुरुप्रती सेवा, समर्पण व प्रेमाची अनुभूती अनुभवास मिळाली. नांदेड येथे सिख धर्मियांचे एक महत्त्वाचे तख्त असल्याने या शहीदी समागम कार्यक्रमाला अनन्यसाधारण महत्व आहे. या कार्यक्रमात विविध धर्म व समुदायांचे भाविक सहभागी होणार आहेत. तरी सर्वांनी नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी केले.

# हिंद की चादर कार्यक्रमाच्या जनजागृतीसाठी सचखंड पब्लिक स्कूलमध्ये विशेष कार्यक्रम



नांदेड /प्रतिनिधी

श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम कार्यक्रमानिमित्त हिंद की चादर हा भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम दिनांक २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग लाभावा, यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात आली आहे.

या मोहिमेच्या अनुषंगाने आज नांदेड येथील सचखंड पब्लिक स्कूल येथे विद्यार्थ्यांना कार्यक्रमाची माहिती देऊन जनजागृती करण्यात आली. तसेच भारताचा नकाशा करून हिंद दी चादर या गीताचे गायन देखील यावेळी केले आणि शहिदांना श्रद्धांजली देखील अर्पण करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, शाळेच्या प्राचार्य अनिल कौर, चत्तर सिंग टंक, रणदीप सिंग पिरंगे, करणपाल सिंग लोणी वाले, भगेंद्रसिंग फौजी आदीची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांनी शाळा स्तरावर विविध स्पर्धा

व उपक्रम राबवून हिंद की चादर कार्यक्रम व्यापक स्तरावर पोहोचवण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले आहे.आज सचखंड पब्लिक स्कूल शाळेच्या प्राचार्या अनिल कौर खालसा यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेच्या संपूर्ण स्टाफच्या मदतीने विद्यार्थ्यांनी भारताचा नकाशा साकारला होता.गुरुबचन सिंग शिलेदार आयटीआय खालसाचे प्राचार्य यांचे मार्गदर्शन लाभले.



# श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम चित्ररथाचे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते उद्घाटन

## पोहरागडाचे महंत सुनीलजी महाराज करणार प्रबोधन

हिंगोली /प्रतिनिधी

नांदेड येथे येत्या २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी आयोजित हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील नऊ समाजासह इतरही भाविकांमध्ये व्यापक प्रमाणावर जनजागृती व्हावी, यासाठी चित्ररथाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोहरादेवी गडाचे महंत सुनीलजी यांच्या हस्ते आज जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात करण्यात आले.

यावेळी नांदेड क्षेत्रिय समितीचे अशासकीय सदस्य ॲड. संतोष राठोड, हरनामसिंह चव्हाण, सतवतसिंह चव्हाण, राज्य समन्वयक तेजासिंह बावरी, रथ जिल्हा समन्वयक अंबादास दळवी, संतोष जाधव, मलकितसिंह भाटीया, दिलीप राठोड, डॉ. आकाश राठोड यांच्यासह समजाबांधव मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

या चित्ररथासोबत पोहरागडाचे महंत सुनीलजी महाराज जिल्ह्यातील तांड्यांवर जावून समाज जनजागृती करणार आहेत. या चित्ररथाच्या माध्यमातून जिल्ह्यातून मोठ्या संख्येने भाविकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे, हा मुख्य उद्देश आहे. हे दोन्ही रथ जिल्ह्यातील वस्ती, तांड्यांवर जावून 'हिंद दी चादर' या विशेष कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# श्याम महाविद्यालयात राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

केज /प्रतिनिधी

श्याम विद्यालय श्याम कनिष्ठ महाविद्यालय व श्याम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्राचार्या सौ जयश्री शरद गदळे, उपप्राचार्य राजेश गंधगे, श्रीमती कुलकर्णी मॅडम, ठोंबरे आयडी मॅडम, ज्येष्ठ शिक्षक ठोंबरे बी. बी. भोसले पी एस घोळवे नागरगोजे बंडू, पाखरे एस ए, मोरे सुनील सर, कोरडे बीबी राऊत टीएम भालेराव धनराज सर हंगे विष्णू, राठोड विजय सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ( छाया तात्यासाहेब डोईफोडे )

# महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात धर्माबाद नगरपालिकेचा नवा इतिहास

## पत्नी सौ. संगीता नगराध्यक्ष तर पती शंकरअण्णा बोलमवाड उपनगराध्यक्ष..!

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद नगरपरिषदेच्या निवडणूकीमध्ये मराठवाडा जनहित पार्टीचे संस्थापक अध्यक्ष शंकर अण्णा बोलमवाड यांच्या पत्नी सौ संगीताताई बोलमवाड यांनी तब्बल ५७०० मतांनी नगराध्यक्ष पदाची निवडणूक जिंकून विरोधकांना जोरदार धक्का दिला. २२ पैकी १५ नगरसेवक निवडून आल्याने नगराध्यक्षाचे पती शंकर अण्णा बोलमवाड यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर धर्माबाद नगरपालिकेने नवीन संगीतमय इतिहास रचला नगराध्यक्षपदी पत्नी तर उपनगराध्यक्षपदी पती असे पती-पत्नी मिळवून आता धर्माबाद नगरपालिकेच्या विकासाचा गाडा हाकणार आहेत.

सदरील निवडणूक प्रक्रिया पीठासन अधिकारी धर्माबाद नगर परिषदेचे मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे यांनी जाहीर केली.तर स्वीकृत सदस्य म्हणून विरोधी पक्षातर्फे डॉ. कमल किशोर काकांनी यांची निवड करण्यात आली. सत्ताधारी पक्षातर्फे उभा असलेल्या अर्जात त्रुटी असल्या कारणाने अर्ज फेटाळण्यात आला.

महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष पती-पत्नीला मिळालेले चर्चेचा विषय ठरत आहे. तर नंतर मराठवाडा जनहित पार्टी अध्यक्ष उपनगराध्यक्ष यांचा पदग्रहण सोहळा या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मोईजो दिन करखेलीकर मा. उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, शेषराव पाटील फडसे माजी सैनिक उद्योजक नांदेड, माजी नगराध्यक्ष विश्वनाथ पाटील बनाळीकर, दिगंबर लखमावाड, देविदास बीपटवार प्रा. लक्ष्मण पटणे,पारस गोधा व सर्व मराठवाडा जनहित पार्टीचे कार्यकर्ते उपस्थित होते. सत्कारास उत्तर देताना उपनगराध्यक्ष शंकर अण्णा बोलमवाड धर्माबाद शहरातील मतदार बंधूंनी मराठवाडा जनहित पार्टीच्या नगराध्यक्ष व १५ नगरसेवकांना मतदारातून भरभरून साथ दिली, त्यांचे ऋण धर्माबाद शहर स्वच्छ व सुंदर बनवण्याशिवाय मी राहणार नाही, पाणी, रस्ते, घनकचऱ्याचे विल्हेवाट, दिवाबत्तीची सोय, या मूलभूत गरजा लोकांना पुरवणार, शहरात मन उद्यान तलावाचे सुशभीकरण, २०२६ हे वर्ष नारीशक्ती वर्ष असल्याने मकर संक्रांति निमित्य महिलांना वान देण्याची घोषणा केली, तसेच शहरातील गरिबाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या अंत्यविधीसाठी ५००० रुपये देण्याची घोषणा केली. शहरातील गरीब लोकांसाठी बँकेमार्फत लघुउद्योग लोन देण्याची घोषणा केली. यावेळी शंकर अण्णा शहरातील नागरिकांच्या



मूलभूत प्रश्नासाठी युवकांची मोठी फळी निर्माण केली. अशा वेळी मराठवाडा जनहित जनहित पार्टीचे उपाध्यक्ष व किंगमेकर मोईज करखेलीकर, माजी सैनिक शेषराव पाटील फडसे, यांची उपस्थितीत होती.तसेच व्यापारी, प्रतिष्ठित,सर्वसामान्य जनता सर्व नगरसेवक, नगरसेवकांचे प्रतिनिधी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक ताहेर पठाण यांनी केले आभार माजी सैनिक शेषराव पाटील फडसे यांनी केले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आत्मविश्वास, नेतृत्व आणि व्यक्तिमत्त्व घडवणारा प्रवास: गुरुकृपाचा दोन दिवसीय उत्कृष्ट उपक्रम संपन्न

माजलगाव : गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, माजलगाव यांच्या वतीने राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निम्मित १२ व १३ जानेवारी रोजी विद्यार्थी, प्राध्यापक तसेच सर्व कर्मचाऱ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास या विषयावर दोन दिवसीय अनोख्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी वक्ते डॉ. अनिलकुमार गर्ग यांची प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थिती लाभली त्याच बरोबर गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले, आयुर्वेदचे प्राचार्य डॉ. प्रज्वल मस्के, फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. मकेश बाबू, फार्मसीचे प्राचार्य डॉ. अमित बिंदू , नर्सिंगच्या प्रा. पूनम खानापूरकर आदी मान्यवर उपस्थितीत होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रज्वल मस्के यांनी केले तद्नंतर डॉ. यशवंत राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना सदरील दोन दिवसीय शिबिराचा आस्वाद घेण्यासाठी संबोधित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा. राहुल वांडरे यांनी केले.







या उपक्रमाचे प्रमुख आकर्षण डॉ. अनिलकुमार गर्ग हे फिनको या कंपनीचे संस्थापक असून ते एक सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय प्रेरणादायी व्याख्याते व सेल्स गुरु म्हणूनही प्रचलित आहेत. या कार्यक्रमात डॉ. गर्ग यांनी व्यक्तिमत्त्व विकासाचे विविध पैलू उलगडून सांगितले. आत्मविश्वास वाढवणे, प्रभावी संवादकौशल्य, नेतृत्वगुण, तणाव नियंत्रण, सकारात्मक विचारसरणी, व्यावसायिक शिस्त, तसेच वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्यांवर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.या एफडीपीमध्ये प्रत्यक्ष उदाहरणे, प्रेरणादायी कथा, संवादात्मक सत्रे व कृतीआधारित उपक्रम यांचा समावेश असल्याने सहभागींच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडवून आणण्यास कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला. सदरील कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. गणेश वाघमारे यांनी केले. प्रस्तुत उपक्रमाची चित्रफित झलक संस्थेच्या समाज माध्यमावर प्रसिद्ध केलेली आहे.

# महाराष्ट्रात ग्रामपंचायत निवडणुका तात्काळ जाहीर करा प्रशासक नको

## भागवत गव्हाणे अन्यथा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा सरपंच ग्रामसेवा परिषदेने दिला

वडवणी/प्रतिनिधी

महाराष्ट्रातील ग्रामीण लोकशाहीचा कणा असलेल्या ग्रामपंचायतींच्या अस्तित्वाचा आणि गावांच्या सर्वांगीण विकासाचा प्रश्न सध्या ऐरणीवर आला आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये राज्यातील सुमारे १४,२३४ ग्रामपंचायतींची मुदत संपणार असून या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायतींवर सरकारी अधिकारी प्रशासक म्हणून नेमू नयेत तर ग्रामपंचायत निवडणुका तात्काळ जाहीर कराव्यात अशी ठाम मागणी सरपंच ग्रामसेवा परिषद महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष भागवत गव्हाणे यांनी केली आहे.

संघटनेचे प्रदेशाध्यक्ष व सरपंच चळवळीचे नेतृत्व करणारे भागवत गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने ग्रामविकास मंत्र्यांची भेट घेऊन या संवेदनशील मुद्द्याकडे लक्ष वेधले. यावेळी ग्रामीण भागातील वास्तव परिस्थिती मांडताना गव्हाणे यांनी प्रशासनाच्या प्रशासक नेमणुकीवर तीव्र आक्षेप घेतला.भागवत गव्हाणे म्हणाले की, एकाच वेळी १४ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपत असल्याने जर प्रशासक नेमले गेले, तर एका अधिकाऱ्यावर किमान १० ते १५ गावांचा अतिरिक्त भार येईल. अशा परिस्थितीत संबंधित अधिकारी गावकऱ्यांना वेळ देऊ शकणार नाहीत आणि निर्णयप्रक्रिया ठप्प होण्याची शक्यता आहे.

फेब्रुवारी-मार्च हा आर्थिक वर्ष संपण्याचा कालावधी असल्याने सध्या अनेक गावांमध्ये १५ वा वित्त आयोग, जलजीवन मिशन, तसेच जिल्हा नियोजनातील विकासकामे प्रगतीपथावर आहेत. ही कामे मार्चअखेर पूर्ण करून निधी खर्च करणे अत्यावश्यक असते. मात्र, या काळात नवीन प्रशासक नेमल्यास त्यांना कामकाज समजून घेण्यातच वेळ जाईल आणि परिणामी कोट्यवधी रुपयांचा विकासनिधी अखर्चित राहून परत जाण्याची भीती



व्यक्त करण्यात आली आहे.

याशिवाय, फेब्रुवारीनंतर राज्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढून पाणीटंचाईची समस्या गंभीर होते. अशा आपत्कालीन परिस्थितीत टँकर नियोजन, विहीर अधिग्रहण व स्थानिक पाणीपुरवठ्याचे प्रश्न लोकनियुक्त सरपंच अधिक प्रभावीपणे हाताळू शकतो, असा ठाम दावा संघटनेने केला आहे. प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून तेवढी तत्परता अपेक्षित नसल्याचेही नमूद करण्यात आले.

दरम्यान, सरपंच ग्रामसेवा परिषद महाराष्ट्र राज्य यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, जर राज्य सरकारने या रास्त मागणीचा गांभीर्याने विचार केला नाही, तर भागवत गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात तीव्र राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल. हा लढा केवळ अधिकारांचा नसून, गावांच्या अस्मितेचा आणि विकासाचा असल्याचे संघटनेने ठामपणे सांगितले आहे.

या निवेदनाला राज्यातील विविध जिल्ह्यांतील सरपंच प्रतिनिधींचा मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळत आहे. आता या महत्त्वाच्या व संवेदनशील विषयावर ग्रामविकास मंत्री व राज्य सरकार काय निर्णय घेतात, याकडे संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

# खोलेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनाधिकारी कॅप्टन सुंदर खडके राज्यस्तरीय बेस्ट ए.एन.ओ अवॉर्डने सन्मानित

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

येथील खोलेश्वर महाविद्यालयातील कॅप्टन सुंदर दिगंबरराव खडके यांना नुकताच मानाचा राज्यस्तरीय बेस्ट ए.एन.ओ अवॉर्ड - २०२५ प्रदान करण्यात आला. हा सन्मान सोहळा राष्ट्रीय छात्र सेनाधिकारी, कुर्ला, मुंबई येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात दिमाखात आयोजित करण्यात आला होता.

असोसिएट एन.सी.सी.ऑफीसर हा पुरस्कार यासाठी प्रदान केला जातो. की, जो राष्ट्रीय छात्र सेनेतील कॅडेट व महाविद्यालये तसेच भारतीय संरक्षण दलात सैनिक पुरवतो - किंवा सैन्य दलात जाण्यासाठी मार्गदर्शन करतो तो म्हणजे ए.एन.ओ होय. एन.सी.सी.च्या माध्यमातून तरूण पिढीला शिस्तबद्ध जबाबदार व देश प्रेमी घडविणारे अधिकारी वर्गाचा कार्याचा गौरव करण्यासाठी या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कॅप्टन सुंदर दिगंबरराव खडके यांनी मागील अनेक वर्षांपासून एन.सी.सी च्या माध्यमातून




विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, राष्ट्रप्रेम, आणि नेतृत्व गुण वाढविण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली यापूर्वी अनेक कॅडेटची निवड अग्निवीर, फायर ब्रिगेड, पोलिस खाते, वनरक्षक दल या विविध पदांवर झालेली आहे. तसेच अनेक कॅडेट्सनी कॅप्टन सुंदर दिगंबरराव खडके यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळविलेले आहे. या कार्याबद्दल कॅप्टन खडके यांचे अभिनंदन केले जात आहे. कॅप्टन सुंदर खडके यांचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राम कुलकर्णी, केंद्रीय कार्यकारणी सदस्य डॉ.कल्पनाताई चौसाळकर, स्थानिक समन्वय समितीचे डॉ.अतुल देशपांडे (अध्यक्ष, खोलेश्वर शैक्षणिक संकुल, अंबाजोगाई.), कार्यवाह किरण कोदरकर (कार्यवाह, खोलेश्वर शैक्षणिक संकुल, अंबाजोगाई.), प्राचार्य डॉ.दीपक फुलारी, उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, प्रा.डॉ.बिभीषण फड, डॉ.रवींद्र कुंबेफळकर, प्रा.आनंद पाठक आदींनी अभिनंदन करून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# बी द चेंज फाउंडेशनकडून भाऊसाहेब काळे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर

आष्टी - (प्रतिनिधी) बी द चेंज फाउंडेशन यांच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार - २०२६ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळसुटी, केंद्र शिराळ, ता. आष्टी येथील मुख्याध्यापक तथा आदर्श शिक्षक भाऊसाहेब प्रल्हाद काळे यांना नुकताच जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कार्याची, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची आणि समाजाभिमुख उपक्रमांची दखल घेऊन हा मानाचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात येणार आहे.

सदर पुरस्कार वितरण समारंभ रविवार, दिनांक १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता आरंभ बँक्वेट हॉल, पारेख कॉर्पोरेशन, तिसरा मजला, महात्मा फुले एज्युकेशन सोसायटीजवळ, जेरबाई वाडीया रोड, दाभोळकर वाडी, परेल भोईवाडा, मुंबई येथे मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला आहे.

भाऊसाहेब काळे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, नवोपक्रमशील उपक्रम, डिजिटल शिक्षणाचा वापर, विद्यार्थ्यांमध्ये संस्कार व मूल्यशिक्षण रुजविणे, तसेच पालक-शाळा समन्वय वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या या कार्यामुळे शाळेचा शैक्षणिक दर्जा उंचावला असून अनेक विद्यार्थ्यांनी यशस्वी वाटचाल केली आहे.

या निवडीबद्दल गटशिक्षणाधिकारी मोहनराव काकडे, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती सीमा काळे, ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी मनोरंजन धस, शिराळ केंद्राचे केंद्रप्रमुख त्रिंबक दिंडे, मुख्याध्यापक संतोष दाणी, प्रहार शिक्षक संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, सचिव विष्णू नेहरकर, जगन्नाथ भगत, शरद चव्हाण, संदीप जगताप, विकास म्हेत्रे, विश्वनाथ जगताप, बापू आजबे, मुटके सर, ह.भ.प. आदिनाथ दानवे महाराज, नारायण तरटे, अशोक धोंडे, महादेव काळे, प्राचार्य दादासाहेब काळे, दिलीप दाणी, राजेंद्र लाड, दिलीपराव काळे, आप्पासाहेब काळे, फत्तेवडगावचे सरपंच नानासाहेब काळे, उपसरपंच जालींदर काळे, शिवाजी खंडू काळे, सतीश शिंदे, भाऊसाहेब गाडे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भीमराव दौलत काळे, उपाध्यक्षा श्रीमती कोमल गोकुळ काळे, संपत आबा काळे, गणेश काळे, सुरेश जेधे, अमोल जाधव, प्रा. विवेक जेधे, शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष मारुती



पठाडे, उपाध्यक्ष अशोक लटपटे, सचिव महेश शिंदे तसेच सर्व संचालक, प्रहार शिक्षक संघटना आष्टीचे पदाधिकारी, ग्रामस्थ, नातेवाईक व मित्र परिवार यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. भाऊसाहेब काळे यांना मिळालेला हा पुरस्कार संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानास्पद असून, त्यांच्या कार्यातून इतर शिक्षकांनाही प्रेरणा मिळेल, अशी भावना सर्व स्तरातून व्यक्त होत आहे.

# समाजाची संवेदनशीलता बोथट होत चालली आहे - प्रो.सुधाकर शेंडगे

आष्टी - (राजेंद्र लाड) आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, ही भावना मनात ठेवून युवकांनी सामाजिक उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घ्यावा व सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे. आजच्या धकाधकीच्या जीवनात समाजमन झपाट्याने बदलत असून आधुनिक तंत्रज्ञान, जीवघेणी स्पर्धा, समाजमाध्यमांचा चुकीचा वापर आणि नैतिकतेचा ऱ्हास यामुळे समाजाची संवेदनशीलता बोथट होत चालली आहे. अपघातात गेलेले जीव असोत किंवा बॉम्बस्फोटासारख्या भीषण घटना असोत, याबाबत आपल्याला काहीच वाटेनासे होणे हे सुदृढ समाजजीवनासाठी अत्यंत घातक आहे. याकडे युवकांनी गांभीर्याने पाहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक प्रा. सुधाकर शेंडगे यांनी केले.

ते येथील भगवान महाविद्यालयात सोमवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता आयोजित आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या 'विद्यार्थी समुपदेशन,



व्यवसाय मार्गदर्शन व प्लेसमेंट कार्यशाळा २०२५ - २६' च्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना त्यांनी या विभागाच्या माध्यमातून युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. चार भिंतींच्या बाहेरही विद्यार्थ्यांना खूप काही शिकण्यासारखे असते, त्याचा उपयोग युवकांनी करून घ्यावा, असे त्यांनी सांगितले. समाजाशी बांधिलकी असणे, यशस्वी होण्यासाठी केवळ शिक्षणच महत्त्वाचे नसणे, शारीरिक कमजोरी शक्तीत कशी बदलता येते, यासंदर्भात त्यांनी सावित्रीबाई फुले, जिजाऊ, बीजमाता राहीबाई पोपेरे, जागतिक स्तरावरील अंध व अपंग विजेत्या महिला तसेच महिन्याला तीस लाख रुपये कमावणाऱ्या अशिक्षित यशस्वी महिलांची उदाहरणे देत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. जिद्द, चिकाटी आणि संघर्षाच्या बळावर, हाताच्या रेषांवर नव्हे तर मनगटावर विश्वास ठेवून दुरापास्त यश मिळवण्यासाठी सतत प्रयत्नरत राहावे, असे आवाहन त्यांनी युवकांना केले.

उद्घाटन कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनीही विविध उदाहरणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी कार्यक्रमाधिकारी व उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके यांनी केले. सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप जरे यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रा. श्रीकांत धोंडे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ. रामदास कवडे यांनी करून दिला. यावेळी मंचावर डी.एड. कॉलेजचे प्राचार्य श्रीकांत निशिगंध, भगवान महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य व डॉ. आप्पासाहेब टाळके उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रमाता - राजमाता जिजाऊ आणि युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

ही दोन दिवसीय कार्यशाळा विविध प्रबोधनात्मक व्याख्यानांनी समृद्ध होती. सोमवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी डॉ. रामदास कवडे यांचे व्यक्तिमत्त्व विकास, डॉ. आबासाहेब पोकळे यांचे लेखन व संभाषण कौशल्य या विषयांवर मार्गदर्शन झाले. मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी डॉ. दिगंबर पाटील यांचे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व प्रा. श्रीकांत धोंडे यांचे उद्योजकता विकास: काळाची गरज या विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजता प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचा समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. हरिदास विधाते उपस्थित होते.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, उपप्राचार्य डॉ. ज्ञानदेव वैद्य व उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी डॉ. दिलीप जरे यांना प्रा. नंदकिशोर धोंडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. दिगंबर पाटील, प्रा. बाबासाहेब झिने, प्रा. श्रीकांत धोंडे, डॉ. आबासाहेब पोकळे व डॉ. नामदेव वाघुले यांचे सहकार्य लाभले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांसह महाविद्यालयातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# संत रविदास महाराज जयंती अध्यक्षपदी हरिभाऊ सवणे यांची निवड

माजलगाव.... राष्ट्रीय चर्मकार महासंघ ता.शाखा माजलगाव महत्त्वपूर्ण बैठक रविवार दि. ११ रोजी दुपारी २.०० वाजता रविदास छत्रपती संभाजी महाराज चौक माजलगाव येथे राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

या बैठकीत सर्वानुमते संत रविदास महाराज व वीर कंकया महाराज जयंती माजलगाव अध्यक्षपदी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे यांची एकमताने निवड झाली.

जयंती सचिव मयूर वाघमारे, कोषाध्यक्ष रमेश जगताप, उपाध्यक्ष राधाकिसन भाळशंकर यांची यावेळी निवड करण्यात आली.

या बैठकीसाठी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे कर्मचारी माजी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे मराठवाडा अध्यक्ष ऍड.गणेश गवळी, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे माजी कार्याध्यक्ष सत्यनारायण उनवणे, वडवणी तालुका अध्यक्ष मधुकर ठोसर,पद्माकर कांबळे, नितीन कांबळे, प्रकाश आगवणे, सचिन वाघमारे,भगवान सोनवणे, प्रसाद वाघमोडे, संतोष पोहेकर, रणवीर काबला, अशोक सोनटक्के,विजय नरहिर,अशोक भालशंकर, विकास गायकवाड यांच्यासह अनेक समाज बांधवांची उपस्थिती होती.



# जि.प.प्रा.शाळा सांगवी पाटण येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील डोईठाण केंद्राअंतर्गत सांगवी पाटण येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात व थाटामाटात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या विशेष कार्यक्रमात वक्त्यांनी दोन्ही महापुरुषांच्या अलौकिक जीवनकार्याचा, त्यागाचा व समाजासाठी दिलेल्या योगदानाचा गौरव केला. स्वामी विवेकानंद यांची जयंती 'राष्ट्रीय युवक दिन' म्हणून साजरी केली जाते, हे सांगत त्यांच्या विचारांनी युवकांमध्ये निर्माण केलेल्या आत्मविश्वास, राष्ट्रप्रेम आणि प्रेरणादायी दृष्टीकोनावर प्रकाश टाकण्यात आला.

सुदर्शन गड, सांगवी पाटणचे महंत ह. भ. प. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री, रवींद्र भोसले, समाजसेवक समीर शेख यांच्यासह शिक्षक व विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. वक्त्यांनी विशेषतः राजमाता जिजाऊ यांच्या संस्कारक्षम व धैर्यशील पालनपोषणामुळे छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये राष्ट्रभक्ती, धर्माभिमान व न्यायबुद्धीचे संस्कार रुजल्याचे सांगितले. तसेच स्वामी विवेकानंद यांनी भारतीय तत्त्वज्ञान व अध्यात्माची ओळख संपूर्ण विश्वाला करून दिली, यावर भर दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मच्छिंद्र देशमुख यांनी केले, तर प्रस्तावना साखरे सर यांनी मांडली. आभारप्रदर्शन बाळासाहेब पोटे यांनी केले.

या प्रसंगी ह.भ.प. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्री, सरपंच दत्तात्रय खोटे, उपसरपंच राहुल खिलारे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर भोसले, ह.भ.प. बाबासाहेब झिंजुर्के महाराज, राऊत महाराज, चौधरी मामा, रवी भोसले, 'शिवरायांचा मुस्लिम मावळा' म्हणून ओळखले जाणारे समाजसेवक समीर शेख, मुख्याध्यापक तुकाराम बोराडे, देशमुख सर, साखरे सर, पोटे सर, खाकाळ मॅडम, रजपूत मॅडम, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षणप्रेमी नागरिक, महिला भगिनी आणि मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, संस्कार आणि आदर्श मूल्यांची जाणीव निर्माण झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## स्वानंद सार्वजनिक वाचनालयात जिजामाता व विवेकानंद जयंती

# व्याख्यान, वक्तृत्व, गीतगायन, कथाकथन कार्यक्रम घेवून संपन्न



केज/ प्रतिनिधी

स्वानंद सार्वजनिक वाचनालय,आनंदगांव ता. केज जि.बीड येथे दिनांक १२ जानेवारी २०२६रोजी राष्ट्रमाता,राजमाता, स्वराज्यजननी जिजामाता व स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंती वाचनालया च्या वाचन कक्षात साजरी करण्यात आली.सर्वप्रथम जिजामाता व विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुजन व वंदन करण्यात आले.

त्यानंतर ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष,जेष्ठ विचारवंत,जेष्ठ समाज सेवक,महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांचे स्वराज्य जननी जिजामाता व युगप्रवर्तक स्वामी विवेकानंद या विषयावर व्याख्यान झाले.राष्ट्रमाता,राजमाता, स्वराज्यजननी जिजामाता हे १६ व्या शतकातील तेजपुंज व्यक्तीमत्व होते. ज्यांनी स्वराज्याला जन्म दिला,दोन छत्रपती घडविले छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज एकाने स्वराज्य निर्माण केले तर दुसऱ्याने स्वराज्याचे रक्षण केले.या कार्यात स्वराज्यजननी जिजामाता यांचे खुप मोठे योगदान होते असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.युगप्रवर्तक विवेकानंद यांनी संपूर्ण विश्वाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य युवकात पाहिले व युवकांचे प्रेरणास्त्रोत बनले असे प्रतिपादन डॉ. वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केले.वक्तृत्व स्पर्धेत ज्ञानेश्वरी पुंड,श्रुती पुंड, वेदिका गायकवाड, अनुष्का गायकवाड,लक्ष्मी चौरे यांनी सहभाग घेवून वक्तृत्व स्पर्धेतून जिजामाता व विवेकानंद यांच्या विचारांची मांडणी केली.गीतगायन स्पर्धेत अनुष्का गायकवाड, वेदिका गायकवाड,सोहम गायकवाद,स्वरा गायकवाड,बाळासाहेब गायकवाड यांनीराष्ट्रमाता, राजमाता,जिजामातेचे कर्तृत्वगीत गायन स्पर्धेतून मांडले.कथाकथन स्पर्धेत एस.के.वैराग,भारत गायकवाड,बाळासाहेब गायकवाड,बबन पुंड यांनी जिजामाता व विवेकानंद उलगडून सांगीतले.प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, माजी ग्रा.प.सदस्य रमेराराव गायकवाड, रावसाहेब जाधव यांची उपस्थिती होती.सर्व कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन व आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद भैय्या गायकवाड यांनी केले.कार्यक्रमाला विद्यार्थी,विद्यार्थिनी,युवक,वाचक,जेष्ठ नागरीक यांची उपस्थिती होती.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत फातिमा शेख यांची जयंती साजरी



केज/प्रतिनिधी

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज या शाळेत मुस्लिम आद्य शिक्षिका फातिमा शेख यांच्या प्रतिमेस श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ यांनी पुष्पहार अर्पण करून पुजन केले व अभिवादन केले.फातिमा शेख यांचा जन्म दि.९ जानेवारी १८३१ रोजी महाराष्ट्र राज्यातील पुणे येथे झाला.फातिमा शेख यांचा धर्म इस्लाम व त्या आधुनिक भारतातील पहिल्या मुस्लिम शिक्षिका होत्या.त्या शिक्षिका व समाजसुधारक होत्या. फुले यांच्या शाळेत दलितांच्या मुलांना शिक्षण देण्याचे काम केले.त्यांनी १८५१ मध्ये मुंबईत दोन शाळांच्या स्थापनेत भाग घेऊन मोलाचे सहकार्य केले.फातिमा शेख यांनी सर्व धर्म आणि जातीच्या बालकांना शिकविले. त्यांनी लोकांच्या दारोदार जाऊन शिक्षणाचं महत्त्व पटवून देण्याचे काम केले. अशा या मुस्लिम आद्य शिक्षिकेच्या प्रतिमेला त्रिवार अभिवादन करून त्यांच्या कार्याचा आपल्या जीवनात उपयोग केला पाहिजे.असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या शाळे तील प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.रामकिशन ग्यानबा मुळे सर, प्राथमिक पदवीधरशिक्षक श्री.संदिप मेघराज ठोंबरे सर,श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर,श्री.राहुल बजरंग बचुटे सर,श्री.आबासाहेब तुळशीराम धपाटे सर, श्रीमती निलावती अनिलकुमार भोरे मॅडम, श्रीमती अंजली गोविंदराव उटीकर मॅडम यांनीही सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.आकाश दत्तात्रय लोंढे सर यांनी केले व शेवटी संदिप मेघराज ठोंबरे सर यांनी आभार मानले.

# मार्च महिन्यात पत्रकार संघाचा बीडमध्ये राज्यस्तरीय मेळावा..!

## विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तिमत्त्वांनी पुरस्कारासाठी संपर्क साधावा

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई चा बीड येथे मार्चमहिन्यात राज्यव्यापी मेळावा घेण्यात येणार आहे.या मेळाव्यामध्ये पत्रकार संघाच्या वतीने बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तबगार व्यक्तिमत्वाला मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.याकरिता विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तिमत्त्वांनी पुरस्कारासाठी संपर्क साधावा असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला बीड जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांनी केले आहे. बीड येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचा पहिल्यांदाच राज्यव्यापी मेळावा मार्च महिन्यामध्ये आयोजित करण्यात आला आहे.या राज्यव्यापी मेळाव्याला महाराष्ट्रातील आयडॉल असलेले व्यक्तिमत्व प्रमुख अतिथी म्हणून लाभणार आहेत.यासह पत्रकार संघाचे राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय प्रमुख पदाधिकारी यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. या सर्व मान्यवरांच्या शुभहस्ते बीडजिल्ह्यातील विविध क्षेत्रांमधील कर्तबगार व्यक्तिमत्त्वांना आणि त्याचबरोबर मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एक कर्तबगार व्यक्तिमत्व आणि एक कर्तबगार व्यक्तिमत्व असलेल्या पत्रकाराला या राज्य स्तरीय मेळाव्यामध्ये मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.या पुरस्कारा साठी बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तिमत्त्वांनी आपल्या संपूर्ण सामाजिक, राजकीय,शैक्षणिक,क्रीडा,सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्ती यांनी माहिती फोटोसहीत व्हाट्सअप नंबर ७०३०१४९३२२ यावर पाठवून पुरस्कारा साठी संपर्क साधावा असे आवाहन मिळाव्याचे आयोजक पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आणि महिला बीड जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांनी केले आहे.

विविध क्षेत्रातील कर्तबगार महिलांनी संपर्क साधावा बीड जिल्ह्यात विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या कर्तबगार महिलांना या राज्यव्यापी मेळाव्यामध्ये गौरवान्वित करण्यात येणार आहे. यासाठी विविध क्षेत्रातील यशस्वी झालेल्या महिलांनी आपल्या संपूर्ण माहितीसह ७०३०१४९३२२ या व्हाट्सअप नंबर वर पुरस्कारासाठी माहिती पाठवावी असे आवाहन पत्रकार संघाच्या महिला बीड जिल्हाध्यक्ष शेख आयेशा यांनी केले आहे.

## पटसंख्या कमी झाल्याने बंद पडलेली जिल्हा परिषद माध्यमिक शाळा केज चालु करण्यासाठी

# ६०० माजी विद्यार्थ्यांचा पुढाकार, प्रजासत्ताक दिनी मेळाव्याचे आयोजन

केज/प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री स्वर्गीय प्रमोद महाजन,कृषी आयुक्त उमाकांत दांगट साहेब यांच्यासह अनेक न्यायाधीश,पोलीस अधिकारी व इतर अधिकारी या जिल्हा परिषद माध्यमीक शाळेने बनवले ती शाळा आज पट संख्येमुळे बंद पडली आहे ती पूर्ववत सुरु करण्यासाठी ६०० माजी विद्यार्थ्यांनी संकल्प केला असुन ही शाळा आदर्श बनवण्यासाठी ६०० विद्यार्थी पुढे आले आहेत.शाळेला गतवैभव मिळूनच देणार असा चंग या विदयार्थ्यांनी बांधला आहे.केज तालुक्यातील एकमेव नावाजलेली जिल्हा परिषद माद्यमिक शाळा केज पटसंख्येच्या अभावी बंद पडली आहे. शाळेची भव्य इमारत विद्यार्थ्यांच्या अभावी धुळखात पडली आहे. अनेक वर्गाची पडझड झालेली आहे.विद्यार्थी नसल्याने अनेक शिक्षकाची बदल्या इतर शाळेवर करण्यात आली आहे.केज तालुक्यात २३ खाजगी शाळा आहेत. शहरात अनेक इंग्लिश स्कुल,उर्दू शाळा असल्या मुळे जिल्हा परिषद शाळे तील विद्यार्थी खाजगी शाळेत इंग्लिश स्कुल मध्ये





जात होती.खाजगी शाळावाले विद्यार्थ्यांना अनेक प्रलोभने दाखवून या शाळेतील विद्यार्थी घेऊन गेले त्यामुळे शाळेतील विद्यार्थी संख्या घटली परिणामी शाळा बंद पडली.या शाळेत

केंद्रीय मंत्री स्वर्गीय प्रमोद महाजन,कृषी आयुक्त उमाकांत दांगट साहेब सह अनेक न्यायाधीश, पोलीस अधिकारी व इतर अधिकारी या जिल्हा परिषद माध्यमिक शाळेने बनवले ती शाळा आज पट संख्येमुळे बंद पडली आहे.या शाळेला भव्य इमारत आहे खेळण्या साठी मोठे मैदान आहे या शाळेने अनेक राष्ट्रीय खेळाडू बनवले आहेत ते खेळाडू आज मोठे अधिकारी,सैन्यदलात अधिकारी सैनिक आपली सेवा बजावत आहेत. शाळेत विदयार्थीनसल्याने वर्ग खोल्या रिकाम्या आहेत.आतील फर्निचर चोरटे पळवत आहेत. इमारतीची पडझड होत आहे.मध्यंतरी समाज माध्यमात शाळेच्या दुरावस्थेबद्दल बातम्या छापून आल्यावर माजी विद्यार्थी व्यथित झाले.

माजी विदयार्थ्यांनी वॉट्सअपवर एक ग्रुप तयार केला त्यात आज १९८० ते १९९५ पर्यंत या शाळेत शिक्षण घेतलेले विद्यार्थी ६०० विद्यार्थी, विद्यार्थीनी जॉईन झाले असुन येत्या २६ जानेवारी ला हे सर्व एकत्र येऊन मेळावा घेणार आहेत. मेळाव्यात पुढील कार्यक्रमाची दिशा ठरवून २०२६ या वर्षात जुन पासुन शाळेत पटसंख्या वाढवुन पाचवी ते दहावी पर्यंतचे वर्ग सुरु करण्या साठी गरजु गरीबांचे मूले जे विदयार्थी परिस्थिती मुळे शिक्षण घेऊ शकत नाहीत असे विद्यार्थी शोधून वर्ग सुरु करण्या साठी प्रयत्न करत आहेत त्यात शाळेच्या वर्गाची दुरुस्ती,फर्निचर, विदयार्थ्यांना मोफत शालेय साहित्य देणे इत्यादी कामे मे महिन्यात पूर्ण करून शाळा सुरु करणार आहेत.ही जिल्हा परिषद माध्यमिक शाळा इतर तालुक्यासाठी पण आदर्श ठरणार आहे या कार्यासाठी ६०० विद्यार्थी व इतर सामाजिक संस्था मदत करत आहेत.

## चेन्नई येथे पार पडलेल्या २२ व्या सब-ज्युनिअर राष्ट्रीय जंपरोप स्पर्धेत

# महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा विद्यार्थिनींचे दैदीप्यमान यश

केज/प्रतिनिधी

दि.५ ते ७ जानेवारी २०२६ रोजी तामिळनाडू शारीरिक शिक्षण आणि क्रीडा विद्यापीठ,चेन्नई येथे भारतीय जंपरोप असोसिएशन यांच्या मान्यतेने आयोजित करण्यात आलेल्या २२ वी सब जुनिअर राष्ट्रीय जंपरोप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



या स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघात बीड जिल्ह्यातील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचे वर्चस्व प्रस्थापित केले आहे.या स्पर्धेत भारता तील विविध राज्यातून आलेल्या खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या आणि अटीतटीच्या लढतींमध्ये बीड जिल्ह्यातील महाराष्ट्र विद्यालय,बनसारोळा येथील खेळाडूंनी आपले नैपुण्य आणि कौशल्य दाखवून दिले.वैभवी सोनके,आरती जोगदंड, मुक्ताई पारेकर,पल्लवी गोरे यांनी डबल टच स्पीड रिले सांघिक प्रकारात रौप्यपदक पटकावले.तर वैयक्तिक फ्री स्टाईल प्रकारात आरती जोगदंड कांस्यपदक पटकावले आहे.प्रशिक्षक मनेश गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी केलेले कठोर परिश्रम या यशाचे मुख्य कारण ठरले.या स्पर्धेतील विजेते खेळाडू आता चीन येथे होणाऱ्याआंतरराष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करतील.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भागवतराव दादा गोरे, सचिव डॉ.नरेंद्र काळे, मुख्याध्यापक बाबासाहेब काकडे व सर्व संचालक मंडळ यांनी खेळाडूंचे व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले आहे.

# जुन्या वादातून हॉटेल चालकावर चाकूने जीवघेणा हल्ला; दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई: अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कुंबेफळ येथे जुन्या भांडणाच्या कारणावरून एका हॉटेल चालकावर चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात हॉटेल चालक गंभीर जखमी झाला असून, त्याच्या भावालाही दुखापत झाली आहे. याप्रकरणी दोन तरुणां विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अशोक पांडुरंग गायकवाड (वय २६, रा. कुंबेफळ) हे आपल्या भावासोबत गावातील 'तिरुपती टी हाऊस' नावाचे हॉटेल चालवतात. १० जानेवारी २०२६ रोजी रात्री नऊ वाजेच्या सुमारास अशोक गायकवाड, त्यांचे वडील आणि भाऊ नरसिंग हे हॉटेलमध्ये असतान गावातीलच रोहन चंद्रकांत गोरे आणि ओम अशोक सावंत तिथे आले. जुन्या भांडणाचा राग मनात धरून आरोपींनी अशोक यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. यावेळी झटापटीत एकाने पकडून ठेवले असता रोहन गोरे याने आपल्या जवळील चाकूने अशोक गायकवाड यांच्या पोटात

चाकूने अशोक गायकवाड यांच्या पोटात वार केला. भावाला वाचवण्यासाठी नरसिंग मध्ये पडले असता त्यांच्या हाताच्या बोटालाही चाकू लागून दुखापत झाली.

चाकूने अशोक गायकवाड यांच्या पोटात वार केला. भावाला वाचवण्यासाठी नरसिंग मध्ये पडले असता त्यांच्या हाताच्या बोटालाही चाकू लागून दुखापत झाली.

घटनेच्या वेळी हॉटेलमध्ये हजर असलेल्या सूरज गायकवाड, अक्षय भोसले, धीरज चव्हाण आणि अविनाश भोसले यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता दोन्ही आरोपी तिथून पळून गेले.

रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या अशोक यांना तात अंबाजोगाई येथील सरकारी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (इछड) २०२३ च्या कलम ३ (५), ३५१ (३), ३५१ (२), ११५ (२), ११८ (१), ११८ (२) आणि १०९ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रंगनाथ मुरलीधर जगताप करत आहेत.

# श्री चिंतेश्वर विद्यालयात 'सप्तशक्ती संगम' कार्यक्रम उत्साहात संपन्न

श्रीकृष्ण इतरत्र नसून तो आपल्या स्वतःमध्ये आहे; फक्त स्वतःला ओळखा - असे प्रेरणादायी प्रतिपादन विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थानच्या राष्ट्रीय मंत्री श्रीमती डॉ. मधुश्रीताई सावजी यांनी केले.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था,अंबाजोगाई संचलित गेवराई येथील श्री चिंतेश्वर विद्यालयात, विद्याभारती अखिल भारतीय शिक्षा संस्थान व भा.शि.प्र.संस्था अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'सप्तशक्ती संगम' हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाईच्या केंद्रिय कार्यकारिणी सदस्य श्रीमती शुभदाताई देशमुख,प्रमुख वक्त्या म्हणून विद्याभारतीच्या राष्ट्रीय मंत्री श्रीमती डॉ. मधुश्रीताई सावजी, तर प्रमुख अतिथी म्हणून गेवराई नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा श्रीमती गीताभाभी पवार, विद्याभारती शिशुवाटिका प्रांत सदस्य व चिंतेश्वर शिशुवाटिका प्रमुख श्रीमती धनश्रीताई पत्की तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुषमाताई मोरगांवकर उपस्थित होत्या. प्रतिमापूजन व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. सप्तशती संगम कार्यक्रमाचा हेतू श्रीमती धनश्रीताई पत्की यांनी आपल्या प्रास्ताविकातून स्पष्ट केला. प्रसंगी सन्माननीय माता-पालक श्रीमती सुमित्रा गिरी,श्रीमती रुक्मिणी आतकरे व श्रीमती मायादेवी लेंडगुळे यांचा आदर्श माता म्हणून गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात विद्यार्थिनींनी सांस्कृतिक सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली. कु.अमृता भोसले,मिसबा शेख,खुशी सोनकांबळे व संस्कृती सोनवणे यांनी सामूहिक



पद्य सादर केले, तर श्रीम.किर्तीताई कुलकर्णी यांनी सुमधुर वैयक्तिक गीत सादर केले. तसेच विद्यालयातील अंजली चव्हाण,कार्तिकी वादे, प्राणदा पाठक, सोनाली सुतार, ऋतुजा मुळे, सानिका घाडगे, ज्ञानेश्वरी वाळेकर, ईश्वरी पळसे, समृद्धी घोलप व ईश्वरी दाभाडे या विद्यार्थिनींनी विविध श्रेष्ठ महिलांच्या वेशभूषेतून त्यांचा संदेश दिला.

नगराध्यक्षा श्रीमती गीताभाभी पवार यांनी आपल्या मनोगतात महिलांनी स्वावलंबी बनून स्वच्छतेची कास धरावी, असे आवाहन केले. प्रमुख वक्त्या श्रीमती डॉ. सावजीताई यांनी कीर्ती, श्री, वाक्, स्मृती, मेधा, धृती व क्षमा या सप्तशक्तींचे महत्त्व विशद करत, जीवनातील स्वबोध परिवर्तनासाठी हिंदी भ अक्षराने सूरू होणार्या भोजन, भाषा,भूषा, भ्रमण, भवन व भजन या सहा गोष्टीचा आग्रह असावा हे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोपात श्रीमती शुभदाताई देशमुख यांनी स्त्री हीच सप्तशक्ती असून प्रत्येक आई आदर्श असते;तिने आपल्या मुलांना योग्य संस्कार द्यावेत,असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमात प्रश्नोत्तर सत्र श्रीमती संघनीताई वक्ते यांनी तर सर्व उपस्थितीतांना श्रीमती विद्याताई कवडे यांनी संकल्प दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती नम्रताताई कुलकर्णी, आभार प्रदर्शन श्रीमती सुषमाताई मोरगांवकर यांनी केले. या कार्यक्रमासाठी स्थानिक पदाधिकारी यांची उपस्थिती होती.कार्यक्रम प्रमुख श्रीमती सविता ताई तेलंग यांच्या नियोजनात सर्व महिला शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले यावेळी गेवराई शहरातील सर्व क्षेत्रातील मान्यवर स्त्रिया बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केज तालुका संघाच्या महिला तालुकाध्यक्षपदी सौ.ज्योतीताई पाटील,उपाध्यक्षपदी सौ.स्वातीताई कसबे तर सचिवपदी सौ.वैशालीताई कराड यांची निवड



केज/प्रतिनिधी

केज तालुका महिला सदस्या मधून सर्वानुमते केज तालुकाध्यक्षपदी सौ.ज्योतीताई पाटील यांची निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणी मध्ये उपाध्यक्षपदी सौ.स्वातीताई कसबे, सचिवपदी सौ.वैशालीताई कराड, कोषाध्यक्षपदी सौ. धनश्रीताई मिटकरी, कार्याध्यक्षपदी सौ. प्रेमलाताई मिसाळ आणि कायदेशीर सल्लागार पदावर अड.स्नेहल पाटील यांची निवड करण्यात आली आहे. नूतन कार्यकारिणीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेश संघटक श्री.संजय भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंदजी वाकडे साहेब,प्रदेश सरचिटणीस श्री.विश्वास रावजी आरोटे साहेब, प्रदेश डिजिटल मिडिया प्रदेशाध्यक्ष श्री.सिद्धार्थजी भोकरे साहेब,प्रदेश समन्वयक श्री.नितीनजी शिंदे साहेब,प्रदेश संपर्क प्रमुख श्री.वैभवजी स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली महीला बीड जिल्हाध्यक्षा आयेशा शेख मॅडम यांच्या आदेशाने केज महिला शाखा सर्वानुमते जाहीर करण्यात आली.

या बैठकीत सर्वानुमते कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

केज तालुक्यातील महिला पत्रकारांच्या संघटनात्मक बांधणीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्षा आयेशा शेख यांच्या स्वाक्षरीने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. ही नियुक्ती दि.१२ जानेवारी २०२६ पासून ते ३१ डिसेंबर २०२६ या कालावधीसाठी वैध राहणार आहे.नियुक्त महिला पत्रकारांकडून संघटनेच्या नियमावली नुसार पत्रकारिताविषयक कार्य,संघटनेचे उपक्रम, सामाजिक प्रश्नांचे वार्तांकन तसेच संघटनेने दिलेल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. तसेच संघटनेची प्रतिष्ठा, शिस्त व उद्दिष्टे जपत कार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या नियुक्ती बद्दल सर्व महिला पत्रकारांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील कार्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील, कार्याध्यक्ष नंदुलाल मिसाळ,सदस्य हिराचंद काळे यांची उपस्थिती होती.



# के.एस.पी विद्यालय येथे राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी

बीड /प्रतिनिधी

दि.१२/०१/२०२६ रोजी शहरातील (कर्मयोगिनी सावित्रीबाई फुले विद्यालय) के.एस.पी विद्यालय येथे राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या मुलांनी आपले मनोगत खुप गोड शब्दात सादर केले. मुलीनी राजमाता जिजाऊ यांची वेशभुषा करुन भाषण सादर केले. मुलांनी स्वामी विवेकानंद यांची वेशभुषा धारन केली.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके ,जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच संस्थाध्यक्षा सौ.अंजलीताई शेळके, तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी उपस्थितीत कार्यक्रम संपन्न करण्यात आली.

# जिल्हा क्रीडा केंद्र मार्फत सॉफ्टबॉल, बेसबॉल, मैदानी खेळाचे प्रशिक्षण शिबिर

बीड /प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत राज्यतील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्राची स्थापना करुन केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील खेळाडूंना नियमीत क्रीडा प्रशिक्षण देण्यात येते. त्या अनुषंगाने जिल्ह्यामध्ये क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण तयार व्हावे. तेसच राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी खेळाडूंना तंत्रशुध्द पध्दतीने प्रशिक्षण मिळावे यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड आणि जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यामाने जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र याद्वारे सॉफ्टबॉल, बेसबॉल, मैदानी या खेळाचे जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र अंतर्गत दि. १६ जानेवारी ते २६ जानेवारी २०२६ या कालावधीत दुसऱ्यांदा शिबीराचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सकाळी ०७ ते १० वा. व सायंकाळी ०४.३० ते ०६.३० वाजेपर्यंत करण्यात आले आहे.

जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर नियमीत प्रशिक्षण देण्यात येणार असून तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सदर शिबीराचा लाभ घ्यावा. असे अवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

या शिबीरात सॉफ्टबॉल खेळासाठी सतिश राठोड, क्रीडा मार्गदर्शक बेसबॉल खेळासाठी रेवननाथ शेलार, क्रीडा मार्गदर्शक आणि मैदानी खेळासाठी अविनाश पाटील, क्रीडा मार्गदर्शक करणार आहेत. अधिक माहितीसाठी सतिश राठोड (सॉफ्टबॉल क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९९२३०१९३५३), रेवननाथ शेलार (बेसबॉल क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९०७५४७६७५१), अविनाश पाटील (मैदानी क्रीडा मार्गदर्शक मो. ९६२३७८११२१) यांच्याशी संपर्क साधावा असे जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी कळविले आहे.

# सोहम संतोष पत्की याने रामकृष्ण मिशन आश्रम, छत्रपती संभाजी नगरमध्ये पटकावले बक्षीस



बीड /प्रतिनिधी

रामकृष्ण मिशन आश्रम, छत्रपती संभाजीनगर आयोजित स्वामी विवेकानंद जयंती निमित्त विविध स्पर्धांचे आयोजन दिनांक २ ते ७ डिसेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले होते. छत्रपती संभाजीनगर जिल्यातील शाळेच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

आयोजित शालेय गट ८ वी ते १० वी उतारा पाठांतर स्पर्धा (इंग्रजी भाषा) ३ डिसेंबर, २०२५ रोजी सोहम संतोष पत्की वर्ग ८ वी, आर्य चाणक्य विद्याधाम, जटवडा याने सहभाग नोंदवून द्वितीय पारितोषिक पटकावले. त्याच्या या सुयशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

स्वामी विवेकानंदांच्या जयंतीच्या पूर्व संध्येला बक्षीस वितरण पार पडले. ट्रॉफी, प्रमाणपत्र आणि स्वामी विवेकानंदांची पुस्तके अशा बक्षिसांचे स्वरूप आहे. अशा स्पर्धांनी स्वामी विवेकानंदांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजवत आहेत. शाळेचे मुख्याध्यापक किशोर कुलकर्णी, मार्गदर्शक श्रीपाद कुलकर्णी आणि लहाने सर व सर्व शिक्षक, पालक आणि आप्तेष्टांनी सोहमचे कौतुक केले आहे.


# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयास शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणात अ दर्जा प्राप्त

माजलगाव /प्रतिनिधी

भाशिप्र संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाने नुकताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५ मध्ये झालेल्या शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणात ऋअ ऋदर्जा प्राप्त केला आहे. सदर अंकेक्षण प्रक्रियेत अध्ययन अध्यापन पद्धती,अभ्यासक्रम रचना, संशोधन कार्य, भौतिक सुविधा, डिजिटल साधनांचा वापर, विद्यार्थी कल्याण योजना, प्रशासकीय पारदर्शकता व गुणवत्ता हमी यासारख्या विविध घटकांचे सखोल मूल्यमापन करण्यात आले. महाविद्यालयाच्या या यशामागे दूरदृष्टी असलेले नेतृत्व अनुभवी व समर्पित प्राध्यापक वर्ग शिस्तबद्ध प्रशासन आणि सातत्याने प्रयत्नशील असलेले विद्यार्थी यांचे योगदान महत्त्वाचे ठरले आहे. आधुनिक शिक्षण पद्धतीचा अवलंब कौशल्य आधारित शिक्षणावर दिला जाणारा भर तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम यामुळे महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा सातत्याने उंचावत गेला आहे. या यशाबद्दल संस्थेचे केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, सुरेंद्र रेदासणी, विश्वास जोशी, अभय कोकड, एकनाथ जाधव यांनी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी व सर्व अंतर्गत गुणवत्ता अनेक सहभागातील सहकारी शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी या सर्वांचे कौतुक केले आहे.

# धारूर तहसील कार्यालयात संजय गांधी व श्रावणबाळ योजनेत ‘बोगस लाभार्थी’ गोंधळ

## मंजुरी फलकावरील नावे खोडली



प्रतिनिधी । धारूर

धारूर तहसील कार्यालयाने २४ डिसेंबर २०२५ रोजी संजय गांधी निराधार योजनेतून १०५ तर श्रावणबाळ योजनेतून ६०२ पेक्षा अधिक अर्ज मंजूर केले. मात्र या मंजुरी यादीत मोठ्या प्रमाणावर बाहेरगावच्या व्यक्तींची नावे धारूरचे रहिवासी दाखवून समाविष्ट करण्यात आल्याचा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते राम शेंडगे यांनी केला असून, मंजुरी फलकावरील नावे कोणी तरी पेनने खोडल्याने संपूर्ण प्रकरण अधिक संशयास्पद बनले आहे.

धारूर तहसील कार्यालयाने संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजना अंतर्गत मोठ्या प्रमाणावर लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर केले. या मंजुरीची यादी नागरिकांच्या माहितीसाठी तहसील कार्यालयाबाहेरील फलकावर लावण्यात आली होती. मात्र ही यादी पाहताच अनेक नागरिकांनी त्यात धारूर तालुक्याबाहेरील तसेच इतर गावांतील नावे असल्याचा आक्षेप घेतला. बाहेरगावचे लाभार्थी धारूरचे रहिवासी असल्याचे दाखवून मंजूर करण्यात आल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते राम शेंडगे यांनी करत तहसील प्रशासनाकडे लेखी तक्रार दाखल केली.

या तक्रारीनंतर आणखी धक्कादायक बाब समोर आली. मंजुरी यादी फलकावर असतानाच काही नावे पेनने खोडलेली आढळून आली. बोगस लाभार्थ्यांची नावे उघड होऊ नयेत म्हणूनच ही नावे मुद्दाम खोडण्यात आली असावीत, अशी चर्चा तहसील कार्यालय परिसरात सुरू आहे. यामुळे संपूर्ण प्रकरणावर संशयाची छाया निर्माण झाली आहे.

दरम्यान, प्रकरण तापत असतानाच तहसील प्रशासनाने बाहेर लावलेला मंजुरी फलक काढून आत कार्यालयात ठेवला आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, माहिती लपविण्याचा हा प्रयत्न आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या संदर्भात योजनेचे नायब तहसीलदार बी. पी. दळवे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी, कोणी नावे खोडली याबाबत मला माहिती नाही. तलाठ्यांकडून आलेल्या कागदपत्रांच्या आधारेच अर्ज मंजूर करण्यात आले आहेत, असे सांगितले. तर संबंधित विभागातील कर्मचारी श्री. खरात यांनी, ज्यांची नावे मंजूर झाली आहेत, त्यांनीच इतरांना माहिती होऊ नये म्हणून स्वतःची नावे खोडली असावीत. तसेच तक्रारीत नमूद केलेल्या नावांची चौकशी करण्यासाठी तलाठ्यांना लेखी पत्र देण्यात आले आहे, असे स्पष्ट केले.

मात्र प्रशासनाच्या या परस्परविरोधी भूमिकांमुळे संशय अधिक गडद होत आहे. सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. संजय गांधी व श्रावणबाळ यांसारख्या गरीब व गरजूंसाठी असलेल्या योजनांमध्ये अशा प्रकारचा गोंधळ उघडकीस येणे ही गंभीर बाब असून, प्रशासनाची विश्वासार्हता पणाला लागली आहे. आता या प्रकरणावर वरिष्ठ काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

# प्रियदर्शनी प्राथमिक शाळा, पाटोदा येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा

**पाटोदा ( प्रतिनधी ) प्रियदर्शनी प्राथमिक शाळा या संस्थेचे सचिव डॉ .योगेश भैय्या क्षीरसागर व डॉ सारिकाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व मुख्याध्यापक मोरे सरांच्या नियोजनातून, पाटोदा येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त वेशभूषा,वकृत्व स्पर्धा तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारा विविध गुण दर्शन उपक्रम आज दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी (सोमवार) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.**

कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ ,स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ.श्री . राऊत साहेब, डॉ.श्री .चौरे साहेब , डॉ.श्री सौरभ जाधव हे उपस्थित होते तसेच शाळेतील पालक श्री मिसाळ साहेब, श्री नागरगोजे साहेब, श्रीमती चापकानडे ताई, श्रीमती केदार ताई, श्रीमती क्षीरसागर ताई, श्रीमती अडागळे ताई, श्रीमती अंकुशे ताई यांच्या सह परिसरातील माता पालक यांचीउपस्थिती होती.यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ यांच्या जीवनकार्यावर आधारित मुलांनी भाषणे सादर करून स्त्रीशिक्षणाचे महत्त्व व समाजसुधारणेचा संदेश दिला.

यानंतर जिजाऊ , स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित घोषवाक्यांनी संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासा बद्दल आदर व सामाजिक जाणीव निर्माण झाली.

यानिमित्ताने आयोजित वेशभूषा उपक्रम हा विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरला. शाळेच्या आवारात विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक गाणी सादर केली... पालकांनीही विद्यार्थ्यांच्या या उपक्रमशीलतेचे कौतुक केले.

... कार्यक्रमांमध्ये डॉक्टर सौरभ जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे नाते म्हणजे जय जिजाऊ जय शिवराय याप्रमाणे हे नाते आहे असे व्यक्त केले या सह शाळेच्या विविध उपक्रमास उपयुक्त अशी मदत देण्याचा मानस व्यक्त केला

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात जिजाऊ, विवेकानंद यांच्या विचारांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. तसेच अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो, असे मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकवृंदाने विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वीर मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती शेलार मॅडम तथा मदतनीस गायके मॅडम तसेच शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले शेवटी आभार प्रदर्शन माताडे सर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पुस्तकातून समाजपरिवर्तनाचा संदेश; शांतीवनच्या कार्याला अनिकेत आमटे यांची प्रेरणादायी साद

## शांतीवनात दीपक नागरगोजे यांच्या पुस्तक प्रकाशनाचा सोहळा उत्साहात संपन्न




मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार तालुक्यातील आर्वी येथील शांतीवन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व समाजसेवक दीपक नागरगोजे यांच्या गुलामीचं जीन व अंधारातलं जगणं या पुस्तकाचे इंग्रजी अनुवादन व हिरवं सपान या दोन सामाजिक आशयाने परिपूर्ण पुस्तकांचे प्रकाशन दि.१२जानेवारी २०२६ रोजी शांतीवनात मोठ्या उत्साहात पार पडले. या सोहळ्यास सुप्रसिद्ध समाजसेवक अनिकेत प्रकाश आमटे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अनिकेत आमटे यांनी केलेले भाषण उपस्थितांना अंतर्मुख करणारे व समाजपरिवर्तनाची दिशा दाखवणारे ठरले.आपल्या भाषणात आमटे म्हणाले की, सामाजिक क्षेत्रात काम करताना अनेकदा कुटुंब, नातेवाईक व समाजाकडून उपेक्षा सहन करावी लागते. मात्र, जेव्हा काम सातत्याने पुढे जाते आणि त्याला ओळख मिळते, तेव्हा तेच लोक पुन्हा आपल्याशी जोडले जातात. दीपक नागरगोजे यांच्या शांतीवनच्या प्रवासातही हेच अनुभव आले असून त्यांनी प्रत्येक समस्येला सामोरे जात तोडगा काढण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.ते पुढे म्हणाले की, आपण संपूर्ण जग बदलू शकत नाही, मात्र एक आदर्श ‘मॉडेल’ उभे करून समाजाला योग्य दिशा देऊ शकतो. शांतीवनने उभारलेले कार्यमॉडेल हे केवळ या भागापुरते मर्यादित न राहता जगभर पोहोचावे, यासाठी या इंग्रजी पुस्तकांचा नक्कीच उपयोग होईल.आजच्या पिढीसमोरील समस्या मांडताना आमटे यांनी मोबाईल व्यसन, शैक्षणिक ताणतणाव, वाढते आत्महत्येचे प्रमाण याबाबत चिंता व्यक्त केली. आजच्या तरुणांना केवळ शिक्षण नव्हे, तर मानसिक आरोग्याचीही गरज आहे. प्रत्येक शाळेत मानसोपचार तज्ज्ञांनी जाऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची नितांत आवश्यकता आहे, असेही त्यांनी नमूद केले.भ्रष्टाचाराच्या वाढत्या समस्येकडे लक्ष वेधत आमटे म्हणाले, शासकीय यंत्रणेत प्रामाणिक व संवेदनशील अधिकारी तयार व्हावेत, यासाठी अशा सामाजिक संस्थांमधून घडलेली मुले प्रशासनात यावीत. अशा पिढीकडूनच भविष्यात खऱ्या अर्थाने बदल घडू शकतो.शांतीवनच्या माध्यमातून उभे राहिलेले कार्य, त्यावर आधारित दोन्ही पुस्तके समाजासाठी प्रेरणादायी ठरतील, असा विश्वास व्यक्त करत आमटे यांनी उपस्थितांना या पुस्तकांचा प्रसार सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर करण्याचे आवाहन केले

# पुण्यातील सेवानिवृत्त अधिकाऱ्याची फसवणूक

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई: अंबाजोगाई तालुक्यातील मोरेवाडी येथील मूळ रहिवासी आणि सध्या पुण्यात स्थायिक असलेल्या एका सेवानिवृत्त बँक अधिकाऱ्याची कोट्यवधी रुपयांची जमीन हडपण्यासाठी बनावट कागदपत्रे तयार करून फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चंद्रकांत रंगनाथ मोरे (रा. मोरेवाडी, सध्या सुसरोड पाषाण, पुणे) यांनी या संदर्भात पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. मोरे हे नाबार्ड बँकेतून २०१६ मध्ये सेवानिवृत्त झाले असून त्यांची मोरेवाडी शिवारात गट क्रमांक ४४ आणि ८५ मध्ये वडिलोपार्जित शेती आहे. या शेतीचे व्यवहार त्यांनी कधीही कोणाशी केले नव्हते. मात्र, आरोपी कर्णमुर्ती गंगाधर साळवे (रा. मोरेवाडी) आणि वैभव बाबाराव तरकसे (रा. धावडी) यांनी संगनमत करून मोरे यांच्या नावाचा बनावट मुद्रांक खरेदी केला. या मुद्रांकावर जमिनीची विक्री केल्याचे बनावट ईसार पावती व साठेखत तयार करण्यात आले.

आरोपींनी या बनावट कागदपत्रांच्या आधारे फिर्यादी कडून १० लाख रुपये रोख देऊन जमीन विक्रीचा व्यवहार निश्चित केल्याचा खोटा बनाव रचला. इतकेच नव्हे तर या बनावट कागदपत्रांचा वापर करून त्यांनी अंबाजोगाई येथील दिवाणी न्यायालयात जमिनीच्या मालकी हक्काबाबत दावा देखील दाखल केला. हा सर्व प्रकार फिर्यादीला त्यांच्या नातेवाईकांकडून कळाला. वकील व न्यायालया मार्फत कागदपत्रांची पडताळणी केली असता आपल्या सहीचा आणि नावाचा गैरवापर करून फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर मा यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

अंबाजोगाई शहर पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३ (५), ३३८, ३४० (२) आणि ३१८ (४) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र घुगे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.